# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657

E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, सोमवार, दिनांक १२ जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३२० ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- +वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## संपादकीय

# मतदार सापडेना

मतदानाची तारीख जसजशी जवळ येत आहे तसतशी सर्वच पक्षाच्या उमेदवारांची धाकधुक वाढली आहे. त्याला कारणही तसेच आहे. अनेक मतदारांची नावे मतदार यादीत आहेत, परंतु त्यांचे मतदार उमेदवारांना सापडत नाही. ही समस्या प्रामुख्याने प्रभागाच्या टोकावर असलेल्या परिसरात दिसून येते. सर्वच पक्षांच्या उमेदवारांनी प्रभागाच्या टोकावर असलेल्या मतदारापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, प्रभाग सीमा वाटणीत काही मतदारांची नावे दुसऱ्या प्रभागात समाविष्ट करण्यात आली. त्यामुळे हे मतदार उमेदवारांना सापडत नाही. काही भाडेकरू मतदार आहेत. परंतु, काही दिवसांपूर्वी त्यांनीही आपले घर सोडून नवीन ठिकाणी रहायला गेल्याने त्यांचेही घर किंवा मतदार उमेदवारांना सापडत नाही. सकाळपासून उमेदवार प्रचाराला निघतात. त्यांचे कार्यकर्ते मतदारांच्या संपर्कात आहेत. परंतु, मतदाराच सापडत नसल्याने उमेदवारांसोबत कार्यकर्त्यांची देखील दमछाक होत आहे. आजूबाजूला विचारणा केल्यास माहित नाही असे उत्तर मिळते. त्यामुळे या मतदारांना कुठे शोधायचे, ते आपल्या प्रभागत आहेत की नाही असा प्रश्न त्यांना पडला आहे. एखादा मतदार सापडलाही, तरी त्याचे मतदान त्याच प्रभागत आहे की नाही असाही प्रश्न आहे. तिकडे मतदार देखील त्रस्त आहेत. नवीन प्रभागात समावेश झालेल्या मतदारांची नावे मतदार यादीत नाहीत. त्यांची नावे दुसऱ्या यादीत आहेत. त्यामुळे मतदारांना देखील आपले नाव शोधता शोधता नाकीनऊ आले आहे. उमेदवारांच्या कार्यकर्त्यांशी संपर्क केला, तर नावच दिसत नसल्याचे त्यांना सांगण्यात येते. त्यामुळे मतदान कुठे करावे असा प्रश्न या मतदारांसमोर उभा ठाकला आहे. एकंदरीत उमेदवारांना मतदार सापडत नाही, तर दुसरीकडे मतदारांना मतदार यादीत त्यांचे नावच सापडत नाही अशी स्थिती निर्माण झाली आहे.

# भाजपने देश विकायला काढला : राज ठाकरे

## गौतम अदानी यांच्या कार्याचाही वाचला पाढा

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. ११



मुंबईतल्या शिवाजी पार्क मैदानावर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंची संयुक्त सभा पार पडली. या सभेत राज ठाकरेंनी भाजपावर हल्लाबोल केला. तसंच मुंबईसह देश विकायाला काढला आहे असाही आरोप राज ठाकरेंनी आपल्या भाषणात केला. मी आणि उद्धव एकत्र का आलो? याचं कारणही राज ठाकरेंनी त्यांच्या भाषणात सांगितली.

शिवसेनेचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंत पाटील आणि जमलेल्या माझ्या तमाम मराठी बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो. या व्यासपीठावर मी अनेकदा बाळासाहेब ठाकरेंसह या व्यासपीठावर आलो. माझे वडील श्रीकांत ठाकरेही असायचे, आजोबा प्रबोधनकार ठाकरेही असायचे, आमची माँ देखील उपस्थित असायची. आज या क्षणाला दोन भाऊ एकत्र आल्यानंतर आम्ही आज प्रबोधनकार ठाकरे, बाळासाहेब ठाकरे, माँ, माझे वडील असायला पाहिजे होते. हे चित्र मराठी माणसांसाठी आम्ही दोन भाऊ या ठिकाणी आलो आहोत हे ते बघत असतील.

२० वर्षांनी मी पहिल्यांदा युती करतो आहे. त्यामुळे या युतीच्या सगळ्या प्रोसेसमध्ये अनेक लोकांना तिकिटं दिली गेली, अनेकांना नाही देता आली, काहींना वाटलं की दुसऱ्या पक्षात जावं. या गोष्टी होतात, आमच्याही हातात या गोष्टी नव्हत्या. पण जे नाराज असतील त्यांची मी दिलगिरी व्यक्त करतो. आत्ता आहेत तेच कुठे जातील माहीत नाही त्यामुळे जे गेले आहेत ते परत येतील. असा टोलाही राज ठाकरेंनी एकत्र आलो.

या सरकारचा उद्दामपणा कुठे गेला? अकोटमध्ये भाजपाने एमआयएमशी युती केली. बदलापूरमध्ये काँग्रेसशी युती केली. ६६ जण बिनविरोध निवडणूक झाली. तिथे मतदानाचा अधिकारच काढून घेतला गेला. वाईट या गोष्टीचं वाटतं की लोक विकले जातात. तुळजापूरमध्ये विनोद गंगणे नावाचा माणूस ड्रग रॅकेटमधला माणूस त्याला भाजपाने तिकिट दिलं. तुषार आपटे हा बलात्काराच्या केसमधला आरोप त्याला भाजपाने नगरसेवक केलं. लहान मुलींवर बलात्कार केल्याचा आरोप असलेला माणूस त्याला नगरसेवक केलं. आली कुठून ही हिंमत? वेड्या वाकड्या पद्धतीने निवडणूक जिंकण्याचं तंत्र समजतं तेव्हा मस्ती आणि माज येतो. अख्खी मुंबई, महाराष्ट्र आणि देश विकायला काढला आहे.

### मी आणि उद्धव एकत्र आलो

मी आणि उद्धव एकत्र आलो याचं कारण मुंबईवर आलेलं संकट. मी अनेक वर्षांपासून बोलत आलो, की कशा प्रकारे डाव रचला जातो आहे. हिंदी सक्तीचा विषय आणल्यानंतर मी पण कडाडलो. उद्धवही कडाडलो. मी त्याआधीच म्हटलं होतं की कुठल्याही वादापेक्षा आणि भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. तिकडून या सगळ्या गोष्टींची सुरुवात झाली. हिंदी सक्तीचा विषय फक्त तुम्हाला चाचपडून बघण्यासाठी होता. मराठी माणूस जागा आहे का? हे फक्त चाचपडणं होतं. २०२४ नंतर म्हणजे विधानसभा निवडणुकीनंतर या सरकारला फेफरं आलं. जे काय हवं ते करायला लागले. इतकी हिंमत आली कुठून? कुणाला विचाराचंय नाही काही नाही, आम्हाला वाटलं की आम्ही केलं. पैसे फेकले की जनतेला विकत घेऊ हा आत्मविश्वास आला कुठून? असा सवाल राज ठाकरेंनी केला. काँग्रेसचीही सत्ता होती. पण जनतेला घाबरुन होते, पण आता घाबरणं वगैरे काहीच नाही असंही राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

# दोन्ही भावांमध्ये राम उरला नाही : देवेंद्र फडणवीस



वृत्तसंस्था
नाशिक, दि. ११

राज्यात महानगरपालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. राजकीय पक्षांच्या प्रचारसभा सुरू असून दोन दिवसापूर्वी ठाकरे बंधूंची सभा झाली. यावेळी राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली होती. या टीकेला आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले.

मी नाशिकमध्ये आल्यानंतर पहिल्यांदा प्रभु श्रीरामाला नमन करतो. श्रीरामांच्या चरणी मी नतमस्तक होतोय. पण, काल दोन भाऊ नाशिकमध्ये येऊन गेले. पण, त्यांना रामाची आठवण झाली नाही. आता त्यांच्यामध्ये राम उरला नाही. जो राम का नहीं वो किसी काम का नहीं. दोन्ही भावांमध्ये राम उरला नाही, असा निशाणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर साधला. आज मुख्यमंत्री फडणवीस यांनी नाशिक महानगरपालिकानिवडणुकीसाठी जाहीर सभा घेतली. यावेळी त्यांनी विरोधकांवर टीका केली. तसेच राज ठाकरे यांनी केलेल्या आरोपांना पत्युत्तर दिले.

या ठिकाणी काहीजण देवाची खिल्ली उडवायला लागले. त्यांच्याबद्दल मी काही बोलणार नाही, नाशिकमध्ये जो काही विकास झाला आणि जो काही विकास होणार आहे. त्याची क्षमता भारतीय जनता पक्षामध्ये आहे. येथे माझी खिल्ली उडवली, म्हणाले नाशिक दत्तक घेतले होते त्याच काय झालं. खऱ्या अर्थाने मी नाशिक दत्तक घेतोय असे सांगितले होते. मी त्यानंतर तक्रार केली नाही. मी नाशिक दत्तक घेतले हे २०१७ साली सांगितले पण २०१९ साली मी विरोधी पक्षनेता झालो. पण मी तक्रार केली नाही.

# ठाकरे अजूनही १० मिनिटांत मुंबई बंद करू शकतात : संजय राऊत

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. ११



मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात आला आहे. तसेच उद्धवसेना आणि मनसे या ठाकरे बंधूंच्या पक्षांच्या युतीने प्रचारामधून भाजपा आणि शिंदेसेनेच्या महायुतीविरोधात जोरदार आघाडी उघडली आहे. तसेच मराठी भाषा आणि मुंबईमधील मराठी माणसाच्या अस्मितेच्या मुद्द्यावरून ठाकरे बंधू आणि संजय राऊत हे भाजपाविरोधात सातत्याने आक्रमक भूमिका घेत आहेत. दरम्यान, ठाकरे आजही दहा मिनिटांमध्ये मुंबई बंद करू शकतात, असा दावा संजय राऊत यांनी केला आहे.

महानगपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये संजय राऊत म्हणाले की, ठाकरे आजही दहा मिनिटांत मुंबई बंद करू शकतात. ठाकरे कुटुंबाने दीर्घकाळापर्यंत राज्याच्या राजकारणाला दिला धिली आहे. ठाकरेंना कधीही संपवता येणार नाही, असेही संजय राऊत यांनी सांगितले. दरम्यान, मनसेप्रमुख राज ठाकरे यांनीही मराठी माणसाच्या हिताबाबत मोठं विधान केलं आहे.

# माजी आमदार दगडू सकपाळ शेकडो समर्थकांसह शिवसेनेत

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. ११



मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर लालबागपरळच्या राजकारणात मोठा राजकीय भूकंप झाला आहे. उबाठाचे ज्येष्ठ नेते, माजी आमदार दगडू सकपाळ यांनी आज शेकडो समर्थकांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे लालबागपरळसह गिरणगावातील राजकीय समीकरणे हादरली असून, उबाठाला हा थेट आणि जोरदार झटका मानला जात आहे.

या प्रवेशावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आक्रमक झाले होते. ''शिवसेना वाढवण्यासाठी तुरुंगवास भोगणारे, शेकडो खोट्या केसेस अंगावर घेणारे निष्ठावान शिवसैनिक बाळासाहेबांना सवंगडी वाटायचे; पण आज काही जण त्या सवंगड्यांनाच घरगडी समजत आहेत, असा घणाघाती हल्लाबोल त्यांनी उबाठावर चढवला. शिंदे म्हणाले, शिवसेना वाचवण्यासाठी, गहाण पडलेला धनुष्यबाण सोडवण्यासाठी आणि बाळासाहेबांचे विचार तोडमोड करणाऱ्यांना धडा शिकवण्यासाठी असे निर्णय घ्यावे लागतात.

आजचा दिवस शिवसेना, बाळासाहेबांचे विचार आणि धनुष्यबाणासाठी निर्णायक असल्याचे सांगत त्यांनी दगडू सकपाळ यांचे कौतुक केले.

दगुडदादा म्हणजे बाळासाहेबांचा कट्टर मावळा, असे ठणकावून सांगताना शिंदे म्हणाले, घरादारावर तुळशीपत्र ठेवून शिवसेना वाढवणारे अनेक शिवसैनिक आज इथे आहेत. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता त्यांनी शिवसेनेसाठी छातीवर वार झेलले.

लालबागपरळ भागात शिवसेना वाढवण्यासाठी दगडूदादांनी अपार कष्ट घेतले असून, त्यांच्या प्रवेशाने लालबागचा राजा आणि गणेश गल्लीच्या राजाचा आशीर्वाद शिवसेनेला मिळाला, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

साडेतीन वर्ष तुरुंगवास भोगणाऱ्यांची अवहेलना होणे हे दुर्दैवी आहे, असा टोला शिंदे यांनी लगावला. बेळगावचा लढा, आंदोलने, शेकडो केसेसया सगळ्याचा विचार कधीच दगुडदादांनी केला नाही, याची आठवण करून दिली.

# एक मंत्री आहे, नेपाळ्यासारखा

## नितेश राणेंवर टीका करताना अबू आझमींची जीभ घसरली

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. ११



महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदानाची तारीख जशी जवळ येत आहे, तसा प्रचाराचा वेग वाढतोय. या प्रचारादरम्यान, नेते एकमेकांवर अनेकदा टोकाची आणि वादग्रस्त टीकाही करत आहेत. अशातच आता, समाजवादी पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आणि आमदार अबू आसिम आझमी यांनी भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे यांच्यावर केलेल्या टिप्पणीमुळे नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या पार्श्वभूमीवर आयोजित कार्यक्रमात बोलताना अबू आसिम आझमी यांनी नितेश राणेंवर वैयक्तिक टीका करत त्यांना ''बुटका मंत्री'' आणि ''नेपाळ्यांसारखा दिसतो'' अशी वादग्रस्त टीका केली. यासोबतच त्यांनी अत्यंत आक्रमक शब्दांत प्रतिक्रिया देत, ''मला ताकद मिळाली, तर अशा मंत्र्याची जीभ कापली नाही, तर एका बापाची औलाद नाही,'' असे वक्तव्यही केले आहे.

अबू आसिम आझमी यांनी नितेश राणेंच्या हिंदुत्वविषयक आणि धार्मिक मुद्द्यांवरील विधानांचा संदर्भ देत आपला रोष व्यक्त केला. त्यांनी आरोप केला की, ''एक मंत्री उघडपणे मस्जिदीत घुसून मुसलमानांना मारण्याची भाषा करतो. आम्ही काय कमकुवत आहोत का? आजपर्यंत आम्ही कोणत्याही मुसलमानाला मंदिराबाहेर उभे राहून घोषणा द्यायला सांगितले नाही. उलट रामनवमीच्या दिवशी आम्ही पाणी देण्यासाठी उभे राहतो. मात्र, देशात राहायचे असेल तर वंदे मातरम म्हणावेच लागेल, अशाप्रकारची विधाने केली जातात. या अशा विधानांवर आमचा आक्षेप आहे.

# लाडक्या बहिणींना 'ही' सवलत

## पाच वर्षांसाठी पाणीपट्टी वाढ स्थगिती

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. ११




मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, महायुतीकडून वचननामा प्रसिद्ध करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत वचननामा जाहीर करण्यात आला. दोन लाख नागरिकांच्या सूचना लक्षात घेऊन हा वचननामा तयार करण्यात आला आहे. या वचननाम्यात झोपडपट्टीमुक्त मुंबई करणे, २० ते ३५ लाख घरांची निर्मिती करणे, बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय विद्यापीठ तयार करणे, पाच वर्षांसाठी पाणीपट्टी वाढीला स्थगिती, धारावीचा विकास हा डीआरपी करणार, ३५० स्क्वेअर फूटपर्यंत आम्ही धारावीतच घरे देणार, अशा बड्या घोषणा मुंबईकरांसाठी करण्यात आल्या आहेत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मुंबई महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने महायुतीचा वचननामा जाहीर करत आहोत.

# शस्त्रासह फिरताना तरुणास अटक

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
नागपूर, दि. ११

अजनी पोलिसांनी गस्तीदरम्यान एका तरुणाला चाकू घेऊन फिरताना अटक केली. शिवम उर्फ शिव शरद शेंद्रे (२२) रा. चंद्रमणीनगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

शनिवारी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास अजनी पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. चंद्रमणीनगर उद्यानाजवळ पोलिसांना शिव संशयास्पदरित्या फिरताना दिसला. त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता मोठा चाकू मिळाला. पोलिसांनी चाकू जप्त करून शिवला अटक केली. त्याच्याविरुद्ध आर्म्स ॲक्ट आणि मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# मेट्रो पार्किंगमधून दुचाकी चोरणारा भामटा गजाआड

नागपूर, दि. ११

मेट्रो स्टेशनच्या पार्किंमधून दुचाकी चोरून, त्यावर बनावट नंबरप्लेट लावून शस्त्रासह फिरणा-या एका सराईत गुन्हेगाराला गुन्हे शाखा युनिट क्रमांक ५ च्या पथकाने बेड्या ठोकल्या.फैयाज अन्सारी वल्द एजाज अन्सारी (२३, भांडेवाडी, पारडी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून चोरीची मोटारसायकल आणि एक धारदार चाकू जप्त करण्यात आला आहे.

माहितीनुसार, शनिवारी रात्रीच्या सुमारास गुन्हे शाखेचे पथक यशोधरानगर परिसरात गस्तीवर होते. यावेळी शासकीय कॅन्सर रुग्णालयाजवळ एक संशयास्पद तरुण दुचाकीसह उभा असल्याची माहिती गुप्त बातमीदाराकडून मिळाली.

# सावनेरात रेती चोरांचा धुमाकूळ पोलिसांची मध्यरात्री धाड

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
नागपूर, दि. ११

खापरखेडा पोलिस पथकाने वारेगाव शिवारात मध्यरात्री मोठी कारवाई करत रेतीची अवैध वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त केला. या प्रकरणात आकाश विजय चौरे आणि सुभाष गणेश भोंडे (दोन्ही रा. बिनासंगम, खापरखेडा) या ट्रॅक्टर चालक व मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस येताना पाहून चालक घटनास्थळावरून पसार झाला.

माहितीनुसार, शनिवारी मध्यरात्री खापरखेडा पोलिस पथक हद्दीत गस्त घालत होते. यावेळी मौजा वारेगाव (ता. सावनेर) येथे रेतीची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मिळताच पोलिस तिथे पोहोचले. पोलिस गाडी पाहताच ट्रॅक्टर चालक (एमएच ४० सीए ९८६८) घाबरून ट्रॅक्टर सोडून अंधाराचा फायदा घेत पळून गेला. घटनेची पाहणी केली असता, ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये दोन ब्रास रेती विनापरवाना असल्याचे आढळले. पोलिस प्रशासनाने दोन ब्रास रेतीसह ट्रॅक्टर आणि ट्रॉली असा ६ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तपासात निष्पन्न झाले की, आरोपी आकाश चौरे आणि सुभाष भोंडे हे स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी शासनाची दिशाभूल करून रेतीची चोरी करत होते.

# पीकपचा धडकेने एक जखमी

नागपूर, दि. ११ : कळमना-कामठी आऊटर रिंग रोडवर भरधाव वेगाने आलेल्या पिकअप वाहन (एमएच १५ जेसी ६५०६) च्या चालकाने नंदकिशोर निमजे यांना मागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात निमजे हे गंभीर जखमी झाले असून, धडक दिल्यानंतर चालक वाहनासह घटनास्थळावरून पसार झाला. माहितीनुसार, शनिवारी पहाटे सुदाम बापूराव हुमणे (६३) हे त्यांचे मित्र नंदकिशोर शंकर निमजे (५०, राम वाटिका, भिलगाव) आणि इतर एका मित्रासह फिरण्यासाठी घराबाहेर पडले होते. आऊटर रिंग रोडवरील पुलासमोरून हे तिघेही पायदळ जात असताना मागून आलेल्या पिकअप चालकाने निष्काळजीपणे गाडी चालवून नंदकिशोर निमजे यांना उडवले.

या अपघातात नंदकिशोर निमजे यांना गंभीर दुखापत झाली.

# वादग्रस्त अधिकारी पूजा खेडकरच्या बंगल्यात दरोडा

वृत्तसंस्था
पुणे, दि. ११



वादग्रस्त अधिकारी पूजा खेडकर हिच्या औंध मधील बंगल्यात दरोडा पडल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. पूजा खेडकरची आई, वडील आणि रखवालदार बेशुद्ध अवस्थेत सापडले. खेडकर तिचा औंमधील नॅशनल सोसायटी परिसरात बंगला आहे. मध्यरात्री खेडकरया बंगल्यात चोरटे शिरले आणि कपाटातील दागिने लुटून नेण्यात आले.

चोरट्यांनी खेडकरची आई, वडिल आणि रखवालदाराला मारहाण केली. मारहाणी ते बेशुद्ध पडले. या घटनेची माहिती मिळतात चतु शृंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम भजनावळे यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेला चोरट्यांचा माप काढण्यात येत असून, पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहे. खेडकर यांच्या बंगल्यात चोरटे नेमके कसे शिरले या दृष्टीने तपास करण्यात येत आहे. खेडकर दांपत्याची पोलिसांकडून चौकशी करण्यात आली आहे.

# सकाळी चहापोहे, चिवडा, रात्रीला चिकन बिर्यांनी

## सर्वच पक्षाच्या कार्यकर्त्यांची चंगळ

दिलीपकुमार दुपारे
नागपूर, दि. ११

महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने सध्या सर्वच पक्षाच्या कार्यकर्त्यांची चंगळ आहे. सुरूवात चिवडा, पोहे, चहापासून होत असून रात्रीला हे कार्यकर्ते मटन आणि चिनक बिर्यांनीवर ताव मारताना दिसत आहेत. सर्वच पक्षात ही स्थिती असल्याने सध्या कार्यकर्त्यांची चंगळ आहे.

निवडणूक म्हटली की, कार्यकर्ते सोबत असायलाच हवेत. कार्यकर्त्यांशिवाय निवडणूक लढविता येत नाही. रॅलीत शे दीडशे कार्यकर्ते असल्याशिवाय रॅलीला मजा येत नाही. याशिवाय दररोज निवडणूक खर्चाचा संबंधित अधिकाऱ्यांना हिशेब देणे, मतदारांशी संपर्क, प्रत्येक कामासाठी कार्यकर्त्यांची गरज भासते. त्यामुळे प्रत्येक पक्षाचा उमेदवार कार्यकर्त्यांना सोबत घेऊन असतो. निवडणुकीनिमित्त प्रत्येक उमेदवार डोअर टू डोअर प्रचाराला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे या उमेदवारांना कार्यकर्त्यांची नितांत आवश्यकता आहे.

प्रचाराला निघताना कार्यकर्त्यांनी उपाशीपोटी निघू नये यासाठी उमेदवार काळजी घेत आहेत. सकाळी सकाळी या कार्यकर्त्यांना चिवडा, पोहे, चहाची मेजवानी देऊन उमेदवार प्रचाराला निघत आहेत. काही उमेदवारांनी आपल्या कार्यकर्त्यांना दररोज एकच एक खाद्यपदार्थ न देता वेगवेगळे खाद्यपदार्थ देत आहेत. त्यात मसाला डोसा, इडली, उत्तपम, सांबर वडा या पदार्थांचा समावेश आहे. दुपारी एक, दोन वाजेपर्यंत प्रचार संपतो. पुन्हा सायंकाळी प्रचार सुरू होतो. खरी गंमत आहे ती रात्रीची. दिवसभर प्रचार करून कार्यकर्त्यांचा थकवा दूर करण्यासाठी रात्रीला मटन, चिकन, चिकन बिर्यानी, दम बिर्यानी, मासे यावर उमेदवारांनी भर दिला आहे. मटन महाग असल्याने बहुतांश उमेदवार चिकनवर भर देत आहेत. त्यात चिकनचे वेगवेगळे पदार्थ तयार करून कार्यकर्त्यांना देत त्यांना खुश ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी उमेदवारांनी काही आचाऱ्यांना बुक केले आहेत. या आचाऱ्यांकडे सकाळपासून ते रात्रीपर्यंत वेगवेगळे खाद्यपदार्थ बनवून देण्याची जबाबदारी सोपविली आहे. काही कार्यकर्ते, तर दुसऱ्या उमेदवाराकडे काय आहे? याचाही कानोसा घेत असल्याचे दिसून येत आहे.

जेथे मासांहारीचे जेवण तेथे कार्यकर्ते तुटून पडत आहेत. कार्यकर्ते तुटू नयेत यासाठी प्रत्येक उमेदवार हा कार्यकर्त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करीत असल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे. त्यामुळे कार्यकर्ते देखील खुश असून जोमाने आपल्या उमेदवारांचा प्रचार करीत आहेत. निवडणूक होईपर्यंत या कार्यकर्त्यांची चंगळ राहणार आहे.




युवाराष्ट्र दर्शन
२
# चंद्रपूर
जिल्हा
सोमवार दि.१२ जानेवारी २०२६

## ऑलम्पिकवीर खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा होणार

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.११ :** राज्य शासनाच्या निर्देशान्वये १५ जानेवारी हा दिवस ऑलम्पिकवीर दिवगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. स्वतंत्र भारताचे पहिले ऑलम्पिक पदक विजेते महाराष्ट्राचे सुपुत्र दिवंगत खाशाबा जाधव यांचा जीवनातून नवोदित खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन मिळावे, यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व शासनमान्य खाजगी शाळा, महाविद्यालय, विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय, क्रीडा संघटना/असोशिएसन, क्रीडा मंडळे, क्रीडा अकादमी, शासनाच्या क्रीडा योजनांचा लाभ/अनुदान मिळालेल्या सर्व संस्था, अन्य संस्था व मंडळे यांनी राज्य क्रीडा दिनाचे आयोजन करावे, असे निर्देश प्राप्त झाले आहेत.याअंतर्गत खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व त्यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान या विषयावरील व्याख्यानांचे आयोजन करावे. प्रा.संजय दुधाने लिखित 'ऑलम्पिकवीर खाशाबा जाधव' हे पुस्तक प्रत्येक शाळा महाविद्यालयांच्या ग्रंथालयात खेळाडूंना वाचनासाठी उपलब्ध असावेत. क्रीडा संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी रॅलीचे / मॅरेथान स्पर्धांचे आयोजन करावे. शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध खेळासंदर्भातील नियमावली, आलिंपिक स्पर्धासोबतच अन्य महत्त्वाच्या स्पर्धा, त्यामधील यशस्वी खेळाडू व अन्य बाबी यांची प्राथमिक माहिती देण्यासाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन तसेच ऑनलाईन संपर्क माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांचा नामवंत खेळाडूंसोबत संवाद साधावा.

# चंद्रपुरात भाजप व काँग्रेसकडून प्रचार सभांचा धडाका

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.११ :** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चंद्रपूर शहरात भाजप व काँग्रेस या प्रमुख पक्षांच्या प्रचार सभांना जोर आला आहे. प्रत्येक प्रभागात उमेदवारांच्या प्रचारासाठी जाहीर सभा, कोपरा सभा, रॅली आणि डोअर टू डोअर प्रचाराचा सपाटा सुरू असून शहरातील राजकीय वातावरण तापले आहे.

भाजपकडून सत्तेतील कामगिरी, विकासकामे, पायाभूत सुविधा, केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा आढावा मांडत मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. वरिष्ठ नेते, आमदार, माजी आमदार व पक्ष पदाधिकारी प्रचार सभांतून सरकारच्या योजनांचा लाभ थेट नागरिकांपर्यंत पोहोचल्याचा दावा करत आहेत. अनेक प्रभागात प्रचार कार्यालयांचे उद्घाटन, महिला व युवकांसाठी स्वतंत्र सभा घेण्यात येत असून संघटनात्मक ताकद दाखवण्यावर भाजपचा भर दिसून येतो.दुसरीकडे काँग्रेसकडून स्थानिक प्रश्न, महागाई, बेरोजगारी, नागरी सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते, कचरा व्यवस्थापन यांसारख्या मुद्यांवर सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली जात आहे. काँग्रेस नेते व उमेदवार 'शहर विकासात भाजप अपयशी ठरला' असा आरोप करत मतदारांना बदलासाठी मतदान करण्याचे आवाहन करत आहेत. काँग्रेसकडूनही प्रत्येक प्रभागात कोपरा सभा, पदयात्रा व बैठकींचा धडाका सुरू आहे.दोन्ही पक्षांकडून प्रचार सभांसाठी बडे नेते चंद्रपुरात दाखल होत असल्याने राजकीय हालचालींना वेग आला आहे. प्रचारात सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असून बॅनर, पोस्टर, व्हिडिओ संदेश आणि लाईव्ह सभांमुळे मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जात आहे.एकूणच चंद्रपुरातील निवडणूक प्रचार रंगात आला असून भाजप व काँग्रेसच्या आक्रमक प्रचार सभांमुळे मतदार कोणाच्या बाजूने कौल देणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## नागरिकांच्या रोषामूळे भाजपच्या माजी नगरसेवकांची झाली गोची



चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या माजी नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत असल्याचे चित्र समोर येत आहे. प्रचारादरम्यान थेट नागरिकांनी विकासकामांबाबत जाब विचारल्याने भाजप उमेदवारांची अडचण वाढली असून, काही प्रभागांत प्रचारावेळी वातावरण चांगलेच तापल्याचे दिसून येत आहे.
प्रचारासाठी घरोघरी भेटी देताना तसेच कोपरा सभांमध्ये नागरिकांनी माजी नगरसेवकांना पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन, पथदिवे आणि मूलभूत सुविधांच्या अपुऱ्या कामांवर प्रश्नांची सरबत्ती केली. 'पाच वर्षे सत्ता असूनही आमच्या प्रभागात नेमके काय काम झाले?' असा थेट सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे.विशेषतः काही प्रभागांमध्ये माजी नगरसेवकांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न झाल्याने नाराजी उघडपणे व्यक्त होत आहे. विकास निधीचा वापर कुठे झाला, कामांची माहिती का देण्यात आली नाही, निवडणूक काळातच का आठवण येते, असे प्रश्न उपस्थित करण्यात आल्याने प्रचारात अडथळे निर्माण झाले आहेत.एकूणच चंद्रपूर मनपा निवडणुकीत भाजपच्या माजी नगरसेवकांना नागरिकांचा जाब आणि उमेदवारांची वाढती गोची यामुळे भाजपसमोर मतदारांचा रोष शांत करण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. या नाराजीचा निवडणूक निकालावर किती परिणाम होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## लाडक्या बहीण योजना संबंधी पत्रावर भाजपाकडून काँग्रेसवर निशाणा

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी लाडक्या बहीण योजनेसंदर्भात काँग्रेसकडून महिलांना पाठवण्यात आलेल्या पत्रावरून चंद्रपूरच्या प्रचार सभांमध्ये राजकीय आरोप-प्रत्यारोपांना जोर आला आहे. भाजपच्या प्रचार सभांमध्ये भाजप नेत्यांनी काँग्रेसवर थेट निशाणा साधत, 'महिलांची दिशाभूल करण्याचा काँग्रेसचा हा जाणीवपूर्वक प्रयत्न आहे,' असा आरोप भाजपाकडून केला जात आहे.आज चंद्रपुरात भाजपाच्या प्रचारसभेत ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी लाडक्या बहीण योजनेबाबत कॉग्रेसच्या भूमिकेचा मुद्दा महिलांना आर्कर्षित करण्यासाठी सभेंत मांडला.भाजप नेत्यांनी सभेत सांगितले की, लाडक्या बहीण योजना ही राज्य सरकारची लोककल्याणकारी योजना असून यामाध्यमातून महिलांना थेट आर्थिक मदत मिळत आहे. 'आज लाखो भगिनींना या योजनेचा लाभ मिळत आहे. योजना लोकप्रिय होत असल्याने काँग्रेस घाबरली असून म्हणूनच खोटी पत्रे पाठवून संभ्रम निर्माण केला जात आहे,' असा दावा करण्यात आला.दरम्यान, काँग्रेसकडून भाजपच्या आरोपांना प्रत्युत्तर देताना, 'आम्ही महिलांची दिशाभूल करत नसून योजनेतील मर्यादा आणि अंमलबजावणीतील अडचणी समोर आणत आहोत,' असे काँग्रेस नेत्यांनी म्हटले आहे.लाडक्या बहीण योजनेवरून सुरू झालेला हा वाद आता प्रचार सभांपर्यंत पोहोचल्याने चंद्रपूर मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण अधिक तापले असून, महिला मतदाराच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# 'मनरेगा बचाव' साठी काँग्रेसचे एक दिवसीय लाक्षणिक उपोषण



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.११ :** केंद्र सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) रद्द करुन विकसीत भारत जी राम जी हा नवीन कायदा आणला असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.या कायद्याला काँग्रेसचा तीव्र विरोध आहे. आणि आता 'मनरेगा बचाओ' या देशव्यापी मोहीमेतून काँग्रेस रस्त्यावर उतरून आंदोलन करीत आहे. ग्रामीण मजुरांचा सन्मान, रोजगार, मजुरी आणि वेळीच निधी देण्याच्या हक्कासाठी एकजुटीने संघर्ष करण्याचा संकल्प आहे.चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने आज चंद्रपुरातील प्रियदर्शनी इंदिरा गांधी पुतळयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुभाष धोटे, चंद्रपूर लोकसभा खासदार प्रतिभाताई धानोरकर, शहर अध्यक्ष संतोष लहामगे, विनायक बांगडे, विनोद दत्तात्रये, रितेश तिवारी, सुभाष गौर, दवे, अनिल नरुले, राजुरा न.प.चे नगराध्यक्ष अरुण धोटे, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष संतोषसिंह रावत तसेच काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

मनरेगाच्या बदलांमुळे ग्रामीण भागातील गरिब, मजूर, शेतमजूर व बेरोजगार घटकांवर थेट अन्याय होत असून रोजगाराच्या हक्कावर गदा येत असल्याचा आरोप काँग्रेस करीत आहे.मनरेगा ही केवळ रोजगार देणारी योजना नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मात्र कामांची संख्या कमी करणे, मजुरी देयकांमध्ये विलंब, जॉबकार्ड व कामाच्या नोंदणीसंदर्भातील कठोर अटी, तसेच तांत्रिक प्रक्रियांमुळे मजुरांना काम मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत. परिणामी अनेक कुटुंबांचे उदरनिर्वाहाचे साधन हिरावले जात असल्याचा दावा करण्यात येत आहे. जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये मजुरांनी कामाची मागणी करूनही त्यांना वेळेवर काम दिले जात नाही. ज्या ठिकाणी काम दिले जाते, तेथे मजुरी वेळेवर मिळत नसल्याने मजुरांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. हे बदल मागे न घेतल्यास ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर वाढण्याची शक्यता असून त्याचे गंभीर सामाजिक परिणाम भोगावे लागतील, असा इशाराही देण्यात आला.काँग्रेसने केंद्र सरकारकडे मनरेगासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याची, १०० दिवसांच्या रोजगाराची हमी प्रभावीपणे अंमलात आणण्याची आणि मजुरांना वेळेवर मजुरी देण्याची मागणी केली आहे.तसेच मनरेगामध्ये केलेले बदल तात्काळ मागे घ्यावेत अशी मागणी चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमिटीने केली आहे.

## गत वर्षभरात नायलॉन मांजा प्रकरणी २८ जणांवर गुन्हे दाखल

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.११ :** दरवर्षी नायलॉन मांजामुळे अनेक लोक जखमी होतात किंवा काही जणांचा मृत्यु होतो. त्यामुळे उच्च न्यायालयाने याची गंभीर दखल घेतली असून विक्री व वापर कर्त्यांविरुध्द शिक्षेची तसेच दंडात्मक कारवाई किंवा दोन्ही बाबींची तरतूद करण्यात आली आहे.
याच अनुषंगाने जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या मार्गदर्शनात जिल्हा प्रशासनाने सुध्दा नायलॉन मांजा विक्री करणारे व त्याचा वापर करणा-यांविरुध्द कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. गत वर्षभरात म्हणजे जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत २६ प्रकरणांमध्ये एकूण २८ जणांविरुध्द गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई तर ५ लक्ष ५६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. गतवर्षी दाखल गुन्ह्यांमध्ये चंद्रपूर शहर पोलिस स्टेशनमध्ये ८ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून १ लक्ष ६१ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.रामनगर पोलिस स्टेशनमध्ये नायलॉन मांजासंदर्भात ५ आरोपींवर गुन्हा दाखल तर १ लक्ष ७१ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त, मुल पोलिस स्टेशनमध्ये ३ आरोपी, ५६ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल, राजुरा पो.स्टे मध्ये २ आरोपी व ७८०० रुपयांचा मुद्देमाल, भद्रावती पो.स्टे २ आरोपी व १३ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल, घुग्घुस पो.स्टे १ आरोपी व ३२०० रुपयांचा मुद्देमाल, दुर्गापूर पो.स्टे १ आरोपी व ६० हजार रुपयांचा मुद्देमाल, वरोरा पो.स्टे २ आरोपी व ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल, कोठारी पो.स्टे १ आरोपी व ४ हजार रुपयांचा मुद्देमाल, बल्लारपूर पो.स्टे १ आरोपी व ८ हजार रुपयांचा मुद्देमाल, गडचांदूर पो.स्टे १ आरोपी व २ हजार रुपयाचा मुद्देमाल तर सिंदेवाही पोलिस स्टेशनमध्ये १ आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करून १४ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## मतदानाचा संदेश घराघरात मनपा शाळांचा उपक्रम




**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.११ :** चंद्रपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर राबविण्यात येत असलेल्या मतदान जनजागृती अभियानांतर्गत चंद्रपूर मनपाच्या २६ शाळा व अनेक खाजगी शाळांनी एकाच दिवशी मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करून मतदान करण्याचा संदेश दिला.या विविध प्रभागात काढण्यात आलेल्या रॅलींद्वारे नागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून देत लोकशाही सशक्त करण्याचा संदेश देण्यात आला. 'मतदान करा, लोकशाही बळकट करा', '१५ जानेवारी लक्षात आहे ना', 'प्रत्येक मत अमूल्य आहे', 'एक मत - उज्ज्वल भविष्य' अशा प्रभावी घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. या उपक्रमात विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून नागरिकांमध्ये जागृती निर्माण केली.याच उपक्रमाच्या अनुषंगाने सर्व शाळांमध्ये पालक सभेचेही आयोजन करण्यात आले. या सभेत पालकांना मतदानाचे महत्त्व, नागरिकांची जबाबदारी व लोकशाहीतील सहभागाचे मूल्य समजावून सांगण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून मोठ्या संख्येने मतदान करण्याचे आवाहन प्रभावीपणे करण्यात आले.

## बल्लारपूर मतदारसंघातील अल्पसंख्याक बहुल भागासाठी ७५ लाखांचा निधी मंजूर!

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.११ :** राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाकडून चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर मतदारसंघासाठी एकूण ७५ लाख रुपयांच्या विकास कामांना मंजुरी देण्यात आली आहे. अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रविकास योजनेअंतर्गत हा निधी मंजूर करण्यात आला असून दुर्गापूर, उर्जानगर आणि बल्लारपूर नगरपरिषद हद्दीतील अल्पसंख्याक बहुल भागातील मूलभूत सुविधांसाठी हा निधी खर्च केला जाणार आहे. यामध्ये विविध धार्मिक व सार्वजनिक ठिकाणी संरक्षण भिंती, पेव्हर्स ब्लॉक, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि सौंदर्यीकरणाची कामे करण्यात येणार आहेत. अल्पसंख्याक विकास विभागाच्या शासन निर्णयानुसार सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी बल्लारपूर मतदारसंघातील विकासकामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या अंतर्गत दुर्गापूर वॉर्ड क्रमांक ३ येथील हक्की मस्जीद परिसरात संरक्षण भिंत बांधकामासाठी १० लक्ष रुपये, दुर्गापूर वॉर्ड क्रमांक १ येथील सेंट मायकल चर्च परिसरात संरक्षण भिंत व पेव्हर्स ब्लॉकसाठी १० लक्ष रुपये तसेच उर्जानगर येथील गुरुद्वारा श्री हर गोविंद साहेब परिसरात पेव्हर्स ब्लॉकसाठी १० लक्ष, उर्जानगर वॉर्ड क्रमांक ५ डब्ल्यूसीएल कॉलनी येथील मस्जीद परिसरात पेव्हर्स ब्लॉकसाठी १० लक्ष रुपये, दुर्गापूर येथील सेंट मेरीस चर्च परिसरात पेव्हर्स ब्लॉकसाठी १० लक्ष, बल्लारपूर येथील ख्रिश्चन कमिटी कब्रस्तानात पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी १० लक्ष रुपये , त्याच कब्रस्तानात विसावा शेड बांधकामासाठी १० लक्ष आणि बल्लारपूर येथील जीवनज्योती चर्च परिसरात सौंदर्यीकरण व अनुषंगिक कामांसाठी ५ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.राज्य शासनाने अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रांमध्ये मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सन २००८-०९ पासून ही योजना राबवली असून २०१५-१६ पासून सुधारित कार्यपद्धतीनुसार योजना सुरू आहे. याच योजनेअंतर्गत सन २०२५-२६ साठी निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यातीलच एक भाग म्हणून बल्लारपूर मतदार संघासाठी ७५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.बल्लारपूर मतदारसंघातील अल्पसंख्याक बहुल भागांमध्ये नागरी सुविधा, सुरक्षितता आणि सौंदर्यीकरणाच्या दृष्टीने हा निधी महत्त्वाचा ठरणार असून स्थानिक विकासाला चालना मिळणार आहे.

## एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल देवाडा करिता प्रवेश अर्ज सुरू

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.११ :** राष्ट्रीय आदिवासी छात्र शिक्षा समितीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी महाराष्ट्रातील एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत येत्या १ मार्च २०२६ रोजी प्रवेश पूर्व परिक्षा एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल, देवाडा, ता.राजुरा, येथे घेण्यात येणार आहे. या परीक्षाद्वारे इयत्ता ६ वी करिता २२२० नविन विद्यार्थ्यांची प्रवेश भर्ती तसेच इयत्ता ७ वी ते ९ करिता रिक्त असलेल्या जागांचा अनुशेष भरण्यात येणार आहे.
एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल, देवाडा मध्ये इयता ६ वी करिता ३० मुले व ३० मुली अशी ६० प्रवेश क्षमता राहणार आहे व इयत्ता ६ वी ते ९ वी ची भरती ही पुर्व परिक्षाद्वारे भरण्यात येणार आहे.

## मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.११ :** समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर अंतर्गत विविध शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येतात. यात साफसफाई व आरोग्यास धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, इयत्ता ९वी व १० वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकपुर्व शिष्यवृ?त्ती, इयत्ता ५ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण फी/ परीक्षा फी या शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.वरील सर्व योजना सन २०२५-२६ पासून महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत असल्याने सर्व मान्यताप्राप्त शाळेतील मुख्याध्यापकांनी त्यांच्या शाळेतील शिष्यवृ?त्तीकरीता पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन सादर करावे, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी केले आहे.

## वाहणगांव येथे गुरु गोविंदसिंग महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**
**चिमूर दि.११ :** तालुक्यातील वाहणगांव येथे गुरुद्वारा मध्ये गुरुग्रंथ साहिब प्रबंध कमेटी याचे कडून ३५९ वी गुरुगोविंद सिंग महाराज यांची जन्म जयंती साजरी करण्यात आली . दिनांक ५ जाने . सोमवारी उत्सवाच्या प्रकाश पर्वाची सुरुवात करुन अखंड पाठ व ७ जानेवारी बुधवार कार्यक्रमांची सांगता करण्यात आली आहे . नागपूरचे सुरजित सिंग बावरी, कळमेश्वरचा हुकमसिंग धापेवाडा येथील नाधनसिंग तळेगावचे नानकसिंग यांनी कार्यक्रमात उपस्थिती दर्शवून गुरुगोविंद सिंग हे शीख धर्माचे दहावे आणि शेवटचे गुरु होते, ज्यांनी 'खालसा पंथ' (१६९९) स्थापन करून शीख समुदायाला एक नवी ओळख दिली, जात-पात मिटवून 'पंच प्यारे' तयार केले आणि शिखांना 'संत शिपाही' (संत आणि सैनिक) बनवले; ते महान लेखक, कवी, संस्कृतसह अनेक भाषांचे जाणकार आणि शूर योद्धा होते, ज्यांनी शिख धर्मासाठी बलिदान दिले आणि 'गुरु ग्रंथ साहिब' यानाच गुरु मानण्याचा आदेश केला अशी गुरु चरित्राची माहीती दिली . गुरुद्वारांमध्ये तेगासिंघ बावरी कथा वाचक अबचल नगर नांदेड यांनी कथा प्रवचन केले . व छत्तरसिंग परदेसी पुना यांनी किर्तन केले गावातूनच भव्य 'नगर कीर्तन' ( शोभायात्रा ) काढली संपूर्ण गावातील जनतेनी 'लंगर' भोजनाचा आस्वाद घेतला खुल्या पेंडॉल मध्ये समारोपीय कार्यक्रम गुरुद्वारा अध्यक्ष रतन सिंग यांनी आपण सारे भाऊ भाऊ, गुण्या गोविंदाने एक साथ राहू असे मत व्यक्त करुन मान्यवरांनी जनतेचे आभार मानले. यावेळी चिमुर पोलीस स्टेशन ठाणेदार दिनेश लबडे , शेगाव पोलीस स्टेशन ठाणेदार यादव, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सतीश वारजुकर चिमूर तालुका प्रेस असोसिएशन सचिव कलीम शेख, सरपंच प्रशांत कोल्हे व सिख बांधव तसेच गावातील जनता मोठ्या प्रमाणात उपस्थितीत होती .

# मतदार जनजागृती स्पर्धेत ९ विद्यार्थी विजयी

## स्वीप अंतर्गत चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा, ७० शाळा व महाविद्यालयांचा सहभाग

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.११ :** स्वीप अंतर्गत चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे घेण्यात आलेल्या आंतर शालेय चित्रकला व आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत विजयी ठरलेल्या विद्यार्थ्यांना आयुक्त अकुनुरी नरेश यांच्या उपस्थितीत बक्षीस देण्यात आले. .

स्वीप अंतर्गत अनेक उपक्रम चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येत आहेत, यात मनपा शिक्षण विभागातर्फे आंतर शालेय चित्रकला व आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली होती. ज्यात जवळपास ७० मनपा व खाजगी शाळा तसेच महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. प्रत्येक शाळेत त्यांच्या स्तरावर झालेल्या स्पर्धेत ३ विजेते निवडण्यात आले होते. या विजेत्यांची अंतिम स्पर्धा मनपा प्रशासकीय इमारतीजवळील वाहनतळावर घेण्यात आली. चित्रकला स्पर्धेत




इयत्ता १ ते ५ या गटात तुषा जाधव,आरोही सुनील महतो,भारती हर्षद पसारे या विद्यार्थिनींनी अनुक्रमे पहिला दुसरा व तिसरा क्रमांक तर इयत्ता ६ ते १० या गटात केतकी महेंद्र किन्हेकर,निर्मला मेघाराम प्रजापती, टिया मनोज दास या विद्यार्थिनींनी अनुक्रमे पहिला दुसरा व तिसरा क्रमांक पटकाविला.असरा वालीम पठाण व आदित्य आनंद टिपले यांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेत प्रथम - पवन मोटघरे,द्वितीय - गुलाब बुरोडे तर तृतीय क्रमांक विघ्नेश्वर देशमुख याने मिळविला व आयशा खोब्रागडे,राहुल गेडाम यांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. निकाल घोषित होताच सर्व विजेत्यांना शालेय व महाविद्यालयीन जीवनात उपयोगी पडतील अशी बक्षिसे देण्यात आली. याप्रसंगी पथनाट्य सुद्धा सादर करण्यात आले.चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण डॉ. किरणकुमार मनुरे,डॉ.देवेंद्र बोरकुटे,प्रा.प्रमोद उरकुडे यांनी केले

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, उपायुक्त संदीप चिद्रवार, स्वीप मोहिमेच्या पिंक अँबेसिडर प्रा. डॉ. जयश्री कापसे - गावंडे,स्वीप आयकॉन नागेश नीत, मनपा शिक्षणाधिकारी सुनील आत्राम,रोशनी तपासे तसेच मनपा अधिकारी कर्मचारी उपस्थीत होते.

## शिवीगाळ करणाऱ्यास हटकल्याने तरुणावर जीवघेणा हल्ला

**•युवाराष्ट्र दर्शन राळेगाव, प्रतिनिधी, दि.११ जानेवारी**

राळेगाव येथील आष्टा रोडवर बेकायदेशीर मंडळी जमवून एका तरुणाला मारहाण केल्याची घटना घडली आहे. फिर्यादी निखील मसराम (२४) याने घरासमोर दारू पिऊन शिवीगाळ करणाऱ्या आरोपी विशाल पेरकुंडे याला हटकले असता, वादाला सुरुवात झाली. फिर्यादी आरोपीच्या घरी समज देण्यासाठी गेले असता, आरोपी रमेश पेरकुंडे याने नालीवरची फरशी उचलून निखीलच्या डोक्यावर मारून त्याला जखमी केले. त्यानंतर इतर आरोपींनी (सौरव कुम्रे, कुणाल डंभारे, सुरज खुरपडे) मिळून फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. पोलिसांनी या पाचही जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे.



## 'सिखें' उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये फुलली सर्जनशीलता

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ११ जानेवारी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'सिखें' संस्थेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या शैक्षणिक उपक्रमाचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. या उपक्रमांतर्गत मिळालेल्या भाषा आणि गणित विषयाच्या कार्यपुस्तिकामुळे विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळाला असून, प्राथमिक शाळेतील विद्यार्थी आता स्वतःच्या शब्दात गोष्टी (कथा) लिहू लागले आहेत.

शिक्षकांसाठी आयोजित 'सिखे'च्या टीआयपी प्रशिक्षणादरम्यान मिळालेल्या 'गोष्ट कशी लिहावी?' या मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांना मोठा फायदा झाला. इयत्ता दुसरी, तिसरीपासूनचे विद्यार्थी आता सुंदर गोष्टी लिहू लागले आहेत. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी केवळ गोष्ट लिहिली नाही, तर त्याला साजेसे चित्र काढतात. आकर्षक शीर्षक लिहून देखील सांगतात. या उपक्रमाचा प्रभाव इतका खोलवर आहे की, अनेक विद्यार्थी आपली गोष्ट दाखवताना, भविष्यात लेखक, लेखिका होण्याचे आणि लिखाणातच करिअर करण्याचे स्वप्न बोलून दाखवत आहेत.

मुलांना फक्त पुस्तकी ज्ञान न देता, त्यांच्या कल्पनाशक्तीला आणि सृजनशीलतेला वाव मिळावा म्हणून सिखें संस्थेमार्फत इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी भाषा विषयासाठी गोष्ट, गोष्टीचे घटक, सारांश, आदी बाबी शिकवल्या जात आहे. केवळ गोष्ट वाचणे नव्हे, तर मुलांनी स्वतः 'लेखक' बनून विचार करावा, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. यासाठी विद्यार्थ्यांना कार्यपुस्तिका देण्यात आल्या असून, त्यात गोष्टीचे घटक ओळखणे या पद्धतीत मुले गोष्टीतील पात्रे, स्थळ, काळ, समस्या आणि उपाय स्वतः शोधायला शिकतात.

## संक्षिप्त

### भरधाव पिकअपच्या धडकेत तरुण जखमी

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ :** यवतमाळ ते घाटंजी रोडवरील चापडोह येथे एका भरधाव पिकअप वाहनाने पादचाऱ्याला जोराची धडक दिली. या अपघातात फिर्यादी इमरान मोसीम बेग (२८, रा. अकोला बाजार) हे गंभीर जखमी झाले आहेत. दि. १६ नोव्हेंबर रोजी रात्री फिर्यादी रोडच्या बाजूला उभे असतांना, एम एच ०२ सी ई ७८६० क्रमांकाच्या बोलेरो पिकअप चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवून त्यांना पाठीमागून धडक दिली. यात फिर्यादीच्या उजव्या पायावरून चाक गेल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली असून पाठीला फॅक्चर झाले आहे. याप्रकरणी अवधुतवाडी पोलिसांनी पिकअप चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### पादचाऱ्याचा मृत्यू

यवतमाळ : शहरातील शिवाजी शाळेसमोर कॅनरा बँकेच्या जवळ झालेल्या अपघातात एका ४७ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. मृतक शाम शरदराव साठवने हे दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी रात्री साडेआठच्या सुमारास पायी जात असतांना, एका अज्ञात मोटारसायकल चालकाने त्यांना धडक दिली. या धडकेत साठवने गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर नागपूर येथे उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. मृतकाचे भाऊ अंकुश साठवने यांनी दिलेल्या तक्रारीवरून यवतमाळ शहर पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

### मोबाईल लंपास

उमरखेड : उमरखेड येथील सुरोशे जिममध्ये व्यायामासाठी गेलेल्या एका डॉक्टरांचा महागडा मोबाईल चोरीला गेल्याची घटना घडली आहे. डॉ. शिवानंद फुलाजी कवाणे (४०, रा. नाथनगर) हे दि. ०१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी जिममध्ये गेले होते. त्यांनी त्यांचा १०,००० रुपये किमतीचा 'रिअल मी नोट १३' कंपनीचा मोबाईल जिमच्या काउंटरवर ठेवला होता. याच दरम्यान संधी साधून अज्ञात चोरट्याने हा मोबाईल चोरून नेला. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून उमरखेड पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# उपवनसंरक्षक कार्यालय क्षेत्रातील भ्रष्टाचाराच्या तक्रारी मुख्य वनसंरक्षक यांचे खुंटीला

**•युवाराष्ट्र दर्शन तालुका प्रतिनिधी दिग्रस, दि. ११ जानेवारी**

पुसद वनपरिक्षेत्र अंतर्गत येणाऱ्या काळी, दिग्रस, पुसद (मारवाडी ) वनपरिक्षेत्रात मागील दोन वर्षे पासून अधिकारी, कर्मचाऱ्यांचे संगनमताने भ्रष्टाचार करून शासकीय तिजोरीची लूट चालवली असतांना अशा आशयाच्या अनेक तक्रारी मुख्य वनसंरक्षक यवतमाळ यांचे कार्यालयात प्राप्त झाल्या असताना त्यावर कुठलीही कारवाई होत नसल्याचे दिसून येत असल्यामुळे सदर तक्रारी खुंटीला टांगल्या गेल्या जात आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.



वन्यप्राण्यांचे हल्ल्यातून पशुधनाचे झालेले नुकसान यातून भरपाई देतांना शासनाची केलेली दिशाभुल व भ्रष्टाचार याबाबत योग्य चौकशी करून संबंधित दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची मुख्य वनसंरक्षक यवतमाळ यांचे सप्टेंबर 2025 मध्ये लेखी तक्रारी प्राप्त आहे. मात्र उपवनसंरक्षक कार्यालय पुसद यांचेकडून थातूरमातूर चौकशी करून सदर प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रकार सुरू असून यामध्ये उपवनसंरक्षक कार्यालयातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांचे हितगुज संबंध गुंतल्याचा आरोप होत आहे. वन्य प्राणी यांच्या हल्ल्यात पाळीव प्राणी मृत पावल्यास त्याचे शव जागेवरून न हलवता वन्य प्राण्याला पूर्ण खाऊ देऊन भरपाई देण्याची प्रक्रिया करावी. याकरिता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम 2023 अमलात आला आहे. यामध्ये कार्यालयातील बाबूंनी बसल्या जागीच संपूर्ण प्रक्रिया पार पाडून शासकीय तिजोरीची लूट केल्याचे निदर्शनास आले असताना दोषी कर्मचाऱ्यावर कायदेशीर कारवाई न करता काही कर्मचाऱ्यांची बाहेरील जिल्ह्यात बदली करून मार्ग मोकळा केल्याची चर्चा होत आहे.शिवाय दिग्रस वनपरिक्षेत्र कार्यालयात एकाच कालावधीत एकच मजूर दुसऱ्या कामावर दाखवून दोन ठिकाणची मजुरी अदा करण्यात आली हा प्रकार दिग्रस वनपरिक्षेत्राचे हद्दीत मागील बऱ्याच वर्षे पासून सुरू असून तो प्रकार उपवनसंरक्षक पुसद यांचे कडे निदर्शनास आला असतांना भ्रष्ट अधिकारी,कर्मचाऱ्यावर कायदेशीर कारवाई करणे ऐवजी सदर रक्कम त्यांच्याकडून भरून घेतली.त्यामुळे निलंबनासारखी कारवाई कुठेही दिसून आली नाही या प्रकारामुळे अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची हिम्मत दिवसेंदिवस वाढत आहे.वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीची योग्य चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

## पृथ्वीराज नगर भाग-१ च्या अध्यक्षपदी रामभाऊ आत्राम

### नवीन कार्यकारिणीची निवड

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ११ जानेवारी**



येथील वडगाव परिसरातील पृथ्वीराज नगर भाग-१ गृह देखभाल सहकारी संस्था मर्यादित यांची वार्षिक आमसभा रविवार, ११ जानेवारी रोजी पार पडली. या सभेत संस्थेच्या जुन्या कार्यकारिणीचे अध्यक्ष प्रल्हाद सिडाम यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे जुनी कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली. त्यानंतर झालेल्या निवड प्रक्रियेत आगामी काळासाठी नवीन कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली.

या नूतन कार्यकारिणीमध्ये अध्यक्ष म्हणून रामभाऊ आत्राम, उपाध्यक्षपदी मधुकर चिव्हाणे, सचिवपदी तुकाराम राठोड, सहसचिवपदी देविदास भालदंड यांची निवड करण्यात आली. तसेच सदस्य म्हणून रमेश पखाले, महादेव मडावी, साहेबराव थिटे, अरूण देव, राजेश हेडावु, गणेश धुर्वे आणि संजय कुटे यांची निवड करण्यात आली आहे. नवीन कार्यकारिणी संस्थेच्या प्रगतीसाठी उत्तम काम करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## प्रशासकीय गोंधळ आणि लोकप्रतिनिधींची उदासीनता

### 'खरुस'चे शेतकरी फार्मर आयडी मुळे शासकीय खरेदीपासून वंचित!

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, ढाणकी, दि. ११ जानेवारी**

उमरखेड तालुक्यातील खरुस खुर्द व खरुस बुद्रुक येथील शेतकरी सध्या 'फार्मर आयडी'च्या तांत्रिक गोंधळामुळे मोठ्या संकटात सापडले आहेत. दोन्ही गावांच्या ऑनलाईन डाटाची अदलाबदल झाल्याने शेतकऱ्यांना आपल्या शेतीमालाची शासकीय विक्री करणे अशक्य झाले आहे. विशेष म्हणजे, या गंभीर प्रश्नाबाबत स्थानिक आमदार आणि बड्या नेत्यांकडे साकडे घालूनही त्यांनी केवळ आश्वासने दिल्याचा आरोप करत शेतकऱ्यांनी आपली तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

**नेमकी अडचण काय?**

खरुस खुर्द आणि खरुस बुद्रुक या गावांच्या नावातील साधर्म्यामुळे ऑनलाईन प्रणालीत मोठी चूक झाली आहे. खुर्दचा डाटा बुद्रुकमध्ये आणि बुद्रुकचा डाटा खुर्दमध्ये गेल्याने ऑनलाईन फार्मर आयडी उपलब्ध होत नाहीत. नाफेड अंतर्गत सोयाबीन किंवा तूर विक्रीसाठी अर्ज करतांना, शेतकऱ्याची स्वतःची शेती दुसऱ्याच्याच नावाने पोर्टलवर दिसत आहे. या तांत्रिक चुकीमुळे खऱ्या शेतकऱ्यांना शासकीय हमीभावाचा लाभ घेता येत नाहीये.

या प्रश्नाबाबत त्रस्त शेतकऱ्यांनी स्थानिक आमदार किसन वानखेडे यांची भेट घेऊन गाऱ्हाणे मांडले, परंतु त्यांनी याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. तसेच भाजप नेते नितीन भुतडा यांच्याकडेही ही व्यथा मांडली असता, त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलून प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, अनेक महिने उलटूनही अद्याप कोणतीही हालचाल झालेली नाही. "निवडणुका आल्या की मदतीला धावणारे नेते आता शेतकऱ्यांच्या पिकाची माती होत असताना कुठे आहेत?" असा जळजळीत सवाल शेतकरी विचारत आहेत.




एकीकडे जिल्हाधिकारी स्तरावर तक्रार करूनही तोडगा निघत नाही आणि दुसरीकडे तलाठी व मंडळ अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. त्यातच आता लोकप्रतिनिधींनीही पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट आहे. सध्या सोयाबीन खरेदीचा हंगाम अंतिम टप्प्यात आहे, जर तात्काळ फार्मर आयडी दुरुस्त झाले नाहीत, तर शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होणार आहे. प्रशासनाने आणि संबंधित नेत्यांनी या तांत्रिक खेळाकडे गांभीर्याने पाहून खरुस खुर्द व बुद्रुकच्या शेतकऱ्यांना त्वरित न्याय मिळवून द्यावा, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा इशारा देऊ असे शेतकऱ्यांत बोलल्या जात आहे

## हक्काच्या महाविद्यालयासाठी विद्यार्थ्यांची वणवण

### तालुक्यालाही मिळेना प्रवेश! उच्च माध्यमिक शिक्षणानंतर पदवीसाठी संकट; शहरात स्वतंत्र 'को-एड' महाविद्यालयाची मागणी

**•युवाराष्ट्र दर्शन ढाणकी | प्रतिनिधी, दि. ११ जानेवारी**

ग्रामीण भागातून नगरपंचायतीचा दर्जा मिळवलेल्या ढाणकी शहराचा विस्तार झपाट्याने होत आहे. शहरात उच्च माध्यमिक विद्यालयांची (कनिष्ठ महाविद्यालय) संख्या पुरेशी असली, तरी पदवी शिक्षणासाठी (Degree College) मात्र विद्यार्थ्यांची मोठी अडचण होत आहे. ढाणकी शहरात सध्या केवळ महिला महाविद्यालय उपलब्ध असल्याने, पुरुष विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी उमरखेड किंवा अन्य शहरांकडे धाव घ्यावी लागत आहे. मात्र, तेथेही जागा मर्यादित असल्याने अनेक होतकरू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य टांगणीला लागले आहे.

**तालुक्याच्या ठिकाणी प्रवेशाची कसरत**

ढाणकी परिसरातील विद्यार्थी पदवी शिक्षणासाठी प्रामुख्याने उमरखेड येथील महाविद्यालयांना पसंती देतात. मात्र, त्या महाविद्यालयांमधील तुकड्यांची संख्या मर्यादित असल्याने सर्वच विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणे कठीण होते. ढाणकीत महिला महाविद्यालय सुरू झाल्याने विद्यार्थिनींची सोय झाली असली, तरी मुलांसाठी मात्र स्वतंत्र किंवा सर्वांसाठी खुले (Co-education) महाविद्यालय नसल्याने त्यांची मोठी गैरसोय होत आहे.

आर्थिक परिस्थिती शिक्षणाच्या आड ढाणकी परिसर हा मुख्यत्वे शेतीवर आधारित असून येथील बहुतांश पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा मजूर आहेत. मोठ्या प्रमाणात गरिबी असल्याने मुलांना दुसऱ्या शहरात पाठवून शिक्षणाचा आणि राहण्याचा खर्च पेलणे या पालकांना शक्य होत नाही. अत्यंत हुशार आणि होतकरू विद्यार्थी केवळ पैशांअभावी उच्च शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे विदारक चित्र सध्या दिसत आहे.

**राजकीय उदासीनतेचा फटका**

" राजकीय नेते आपली पोळी भाजण्यात मग्न आहेत, मात्र विद्यार्थ्यांच्या या मूलभूत अडचणी ऐकून घेण्यास कोणालाही वेळ नाही," असा आरोप संतप्त विद्यार्थ्यांनी केला आहे. तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली असताना, ढाणकीतील विद्यार्थ्यांना मात्र साध्या पदवी प्रवेशासाठी धडपड करावी लागत आहे. शासनाने ढाणकी शहराची गरज आणि विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन येथे एक स्वतंत्र 'स्वातंत्र्य महाविद्यालय' मंजूर करावे, जेणेकरून गरीब आणि ग्रामीण भागातील मुलांच्या उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल, अशी मागणी ढाणकी परिसरातील उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांकडून केली जात आहे.

## माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन पुसद भाऊसाहेब माने समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी पुसद, दि. ११ जानेवारी**

दिनांक 10 जानेवारी 2026 रोजी महात्मा जोतिबा फुले यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भाऊसाहेब माने कृती समिती द्वारे आयोजित सन 2026 चा सत्यशोधक भाऊसाहेब माने समाज भूषण पुरस्कार माणुसकीच्या भिंती सोशल फाउंडेशनला देण्यात आला. जिजाऊ सांस्कृतिक भवन उमरखेड येथे हा कार्यक्रम पार पडला. मागील दहा वर्षापासून गरजवंतांसाठी रात्रंदिवस उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या, माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन पुसद च्या सर्व सदस्यचा या कार्यक्रमामध्ये सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे उदघाटक हनुमंतराव गायकवाड उपविभागीय पोलीस अधिकारी(SDPO) उमरखेड यांच्या हस्ते सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन माणुसकीची भिंत पुसदच्या सदस्यांना सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. वि. ना. कदम हे होते. या प्रसंगी व्यासपीठावर उमरखेडचे ठाणेदार शंकरराव पांचाळ, प्रवीण सूर्यवंशी, शिवाजी देशमुख सवणनेकर, श्रीराम पाटील नलावडे, अजय माहेश्वरी, डॉ.अमोल देशमुख, नगरसेवक साजिद जहागीरदार,हनुमान हिरवळ, अशोक वानखेडे, निलेश जैन,सारकर,रवी शेलार,आनंद शिंदे विश्वंभर वानखेडे,आकाश माने, सुनील वानखेडे,बालाजी वानखेडे व इतर मान्यवर उपस्थित होते.या प्रसंगी माणुसकीची भिंती सोशल फाउंडेशन पुसदचे अध्यक्ष गजानन जाधव,सचिव पंजाबराव ढेकळे सदस्य अनंता चतुर,मधुकर चव्हाण,मंगेश भगत, शिवराम शेटे, साई वट्टमवार, दिगंबर देशमुख इत्यादी उपस्थित होते.



# आज स्वामी विवेकानंद भव्य स्मारकाचा सोहळा

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ११ जानेवारी**

यवतमाळ येथे 12 जानेवारी 2026 रोजी स्वामी विवेकानंद भव्य स्मारकाचा ऐतिहासिक अनावरण सोहळा भारतीय अध्यात्म, युवक प्रेरणा व राष्ट्रनिर्मितीचे महान प्रतीक असलेल्या स्वामी विवेकानंद यांच्या 18 फूट उंच भव्य स्मारकाचा अनावरण सोहळा सोमवार, दिनांक 12 जानेवारी 2026 सकाळी 9.00 वाजता सामका आयुर्वेद योग व वेलनेस सेंटर, गोधनी बायपास, यवतमाळ येथे अत्यंत पवित्र व प्रेरणादायी वातावरणात संपन्न होणार आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख संत उपस्थिती या भव्य सोहळ्याचे कार्यक्रमाध्यक्ष म्हणून परमपूजनीय श्रीमत स्वामी विष्णुपादानंदजी महाराज प्रमुख रामकृष्ण मिशन आश्रम, छत्रपती संभाजी नगर यांची लाभणार आहे.

प्रमुख पाहुणे म्हणून परमपूजनीय श्रीमत स्वामी राघवेंद्रानंदजी महाराज अध्यक्ष, रामकृष्ण मठ, नागपूर यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच परमपूजनीय श्रीमत स्वामी ओ'कारेषानंदजी महाराज, परमपूजनीय श्रीमत स्वामी चेतनात्मानंदजी महाराज श्रीरामकृष्ण मंडळ गोंदिया यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

या ऐतिहासिक सोहळ्यास नामदार संजय राठोड मृद व जलसंधारण मंत्री तथा पालकमंत्री यवतमाळ विशेष अतिथी डॉ. संदीप राठोड संचालक, क्रीडा व युवा मंत्रालय, भारत सरकार विशेष निमंत्रित डॉ. प्रवीण जोशी (राष्ट्रीय आयुर्वेद गुरु), जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांची उपस्थिती लाभणार आहे.

युवक प्रेरणेसाठी उभारलेले स्मारक राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून उभारण्यात येणारे हे स्वामी विवेकानंद स्मारक युवकांमध्ये चारित्र्यनिर्मिती राष्ट्रभक्ती, आत्मविश्वास सेवा व समर्पण या मूल्यांची जोपासना करणारे प्रेरणास्थान ठरणार आहे. सर्व जनतेस जाहीर निमंत्रण या ऐतिहासिक व प्रेरणादायी स्मारक अनावरण सोहळ्यास युवक, विद्यार्थी, शिक्षक , सामाजिक कार्यकर्ते सर्व विवेकानंद प्रेमी नागरिक यांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे स्वामी विवेकानंद स्मारक समिती, देवी सामका महिला बहुउद्देशीय संस्था व सर्व सभासद यांच्या वतीने विनम्र आवाहन करण्यात येत आहे.



## जैन महिला मंडळाची नवीन कार्यकारिणी घोषित

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी, दि. ११ जानेवारी**

शहरातील जैन महिला मंडळाची नवीन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. या कार्यकारिणीत अध्यक्षपदी सौ.नंदा भंडारी, उपाध्यक्षपदी श्रीमती किरण डुंगरवाल, सचिवपदी सौ. विद्या मुथा तर कोषाध्यक्षपदी सौ. अंशुमा अनिल झाबक यांची निवड करण्यात आली तर श्रीमती चंद्रकला बाई मुथा, सौ. कल्पना दिपक छाजेड, सौ. ममता कस्तुर सांड, सौ.वर्षा पंकज भंडारी, सौ. वंदना सतिश भंडारी, सौ.प्रियंका निलेश लोढा, सौ. वृशाली विशाल हिरण यांची सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. सामाजिक, धार्मिक व सेवाभावी उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार नव्या कार्यकारिणीने व्यक्त केला आहे. मंडळाच्या सर्व सदस्यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

**CHANGE OF NAME**

Old Name - **Ajij Gaffar Rajkotiya**

New Name in Documents - **Abdul Ajij Gaffar Rajkotiya.**

I will hereafter use my new Name as Abdul Ajij Gaffar Rajkotiya in all my transactions and deeds.


Add-Main Road,Arni

Dist. Yavatmal -445103

**वार्ताहर व एजेन्सी नियुक्ती करणे आहे**
मराठी लोकप्रिय दै. युवाराष्ट्र दर्शन करिता गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, तिरोडा, गोंदया क्षेत्रात वर्तमान पेपरच्या एजेन्सी व वार्ताहर करिता संपर्क साधा मो. ९५१८९३४०९६

**युवाराष्ट्र दर्शन, गोंदिया जिल्हा कार्यालय**
जिल्हा प्रतिनिधी मुकेश कुमार मिश्रा, कार्यालय पत्ता मनोहर चौक, गोविंदपूर रोड बग्गा कॉम्प्लेक्सच्या जवळ गोंदिया, ता. जि. गोंदिया बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क करा मो./व्हॉटअप नं. ९१७५२८३७४०

# शिरपुर आरटीओ चेकपोस्ट : आर्थिक लुटीचा अड्डा




**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**देवरी :** तालुक्याच्या शिरपुर (ऊध ण्पम्व्ज्दे) सीमेवर असलेला सीमा शुल्क तपासणी नाका येणाऱ्या जाणाऱ्या वाहन चालकांच्या आर्थिक लुबाडणुकीचे केंद्र बनले असून येथील अधिकाऱ्यांना मेवा दिल्याशिवाय साधा ट्रकसुद्धा या चेकपोस्टवरून पास होऊ शकत नाही. यासाठी येथे पंटरांची फौज कार्यान्वित असून अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट वृत्तीमुळे शासनाचा दररोज कोट्यवधींचा महसूल लाटणारी आरटीओ चेकपोस्ट बनली आहे. या चेकपोस्टवरून नागपूर - रायपुर व रायपुर - नागपूर या मार्गावरची वाहने जात असतात. पैसे दिल्याशिवाय जाता अथवा येता येत नाही. या प्रकारात राज्याचा लाखोंचा महसूल बुडत असून, शिरपूर चेकपोस्टमुळे माहाराष्ट्र राज्याची बदनामीही होत आहे.

ऐकीकडे इंधन महाग झाल्याने (ऊध ण्पम्व्ज्दे) महागाईचा मार ट्रकचालकांवर पडत असून अधिकारी मात्र गब्बर होत आहेत. दुसरीकडे परिवहन अधिकाऱ्यांच्या अवैध वसुलीमुळे ट्रकचालकसुद्धा आर्थिकदृष्ट्या त्रासले आहेत. त्यामुळे, देवरी तालुक्यातील शिरपूर चेकपोस्टची आर्थिक चौकशी करावी, अशी ट्रकचालकांची मागणी आहे. या ठिकाणी वाहनांच्या रांगाच रांगा लागलेल्या दिसतात. यासाठी प्रशासकीय इमारतीत चक्क एका खिडकीतून अवैध वसुली घेतली जात असल्याचा आरोप येथील वाहन चालक करीत आहेत. विशेष म्हणजे नेमकी या मार्गाने वाहतूक टोकनरूपी पास दिल्याची धक्कादायक माहिती वाहन चालक देतात. व मासीक पास संपली की शिरपूर परीसरातीलच हॉटेलातुन वाहनचालकांना हिपास हजारो रुपये वाहनचालकांकडुन घेत नवी पास वाहनचालकांना दिली जाते. हा प्रकार दररोज सुरु असून वाहन चालकाना फुकट आर्थिक भुर्दंड भरावा लागतो आहे. त्यामुळे, शासनाने ही अवैध वसुली बंद करण्याची मागणी वाहन चालकांनी केली आहे.

### ती खिडकी 'कुबेराचे द्वार' महाराष्ट्राचीच बदनामी

**कागदपत्र बरोबर असले तरी तपासणीची एक खास शैली आहे. वाहन थांबवले जाते. (ऊध ण्पम्व्ज्दे) कायद्याचा धाक दाखवून काहीतरी कारवाई करण्याची धमकी आरटीओनी चेकपोस्टवर उभे ठेवलेल्या फंटराकडून दिली जाते. शिरपूर चेकपोस्टवर नियमांना धाब्यावर बसवल्या जात असल्याचा आरोप ट्रकचालकांचा आहे. महाराष्ट्रात प्रवेश केल्याची पूर्तता केल्यानंतर ही महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांची लुबाडणूक थांबवण्याची आणि चेक पोस्टची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी परप्रांतातील वाहन चालक आता करीत आहेत. हा संपूर्ण प्रकार महाराष्ट्र राज्याचीच बदनामी करणारा असल्याची या परप्रांती वाहनचालकांचे म्हणणे आहे. लवकरच देवरी तालुक्यातील शिरपूर चेकपोस्टवर वरीष्टानां निवेदन देत आंदोलन केल्याजानार असल्याचा स्थानीक सामाजीक संघटनाच्या पदाधीकार्यानीं सांगीतले आहे.**

# खड्ड्यातील पाण्यात बुडून इसमाचा मृत्यू

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**देवरी :** तालुक्यातील गटग्रामपंचायत शिरपूरबांध अंतर्गत पदमपूर येथे एका मुरूमाच्या खानीच्या खड्ड्यात इसमाचा बुडून मृत्यू झाला. ही घटना ९ जानेवारी सकाळी ७ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. आसाराम आचले (५६) असे मृताचे नाव आहे.

तालुक्यातील ग्राम पदमपुर येथील मृतक आसाराम झिटु आचले हा इसम काल दि. ८ जानेवारी २०२६ रोज गुरुवारच्या सकाळी ९:०० वाजे दरम्यान गावालगत असलेल्या मुरूम खड्ड्यानजीक प्रातःविधी करण्याकरिता गेला होता. मृतक दिवसभर घरी न आल्याने, गावात पुनर्विवाह चा कार्यक्रम असल्यामुळे मृतक हा वऱ्हाड्यांसह वराती सोबत गेला असेल असा कुटुंबातील सदस्यांना अंदाज होता. परंतु, कार्यक्रम आटोपून लग्न मंडळी गावात परत आली. पण, आसाराम घरी परत आलाच नाही. त्यामुळे सायंकाळ दरम्यान कुटुंबातील सदस्यांनी शोधाशोध केला. पण कुठेच त्याचा शोध लागला नाही. ९ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजेदरम्यान गावातील एक व्यक्ती त्याच मुरूम खड्ड्याकडे प्रातःविधी करण्याकरिता गेला असता, त्याला खड्ड्यातील पाण्यामध्ये एक व्यक्ती मरण पावलेला दिसला. त्यांनी ही माहिती गावात सांगितली. गावकरी मुरूम खड्ड्याजवळ गोळा होऊन मृतकाला पाण्याबाहेर काढले. सदर घटनेची माहिती पोलीस ठाणे देवरी येथे देण्यात आली. घटनास्थळी पोलीस अधिकारी पोहोचून सदर घटनेचा पंचनामा केला. मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनाकरिता ग्रामीण रुग्णालय देवरी येथे पाठविण्यात आले. मृतक हा मिर्गीच्या बिमारीने ग्रस्त असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**तिरोडा :** स्थानिक प्रगती नगर येथील सरस्वती इंग्लिश शाळेत ३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सौ. रत्ना पराधी, मुख्याध्यापक कु. चेतना रामे, मसौ. बबिता पारधी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला दीप प्रज्वलित व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षण कार्यावर प्रकाश टाकत शाळेच्या मुख्याध्यापिका कु.चेतना राणे यांनी विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले जेव्हा शाळेत शिकवायला जायच्या तेव्हा लोकांनी त्यांचा खूप अपमान केला, तरी पण त्या न डगमगता त्यांनी आज सर्व स्त्रियांना शिक्षणाचे दार उघडून दिले. तसेच कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सुद्धा भाषणे, कविता व गीतांच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा जागर केला. यावेळी सायन्स एक्जीबिशन मॉडेल वर्ग चौथी ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मॉडेल तयार केले होते. वर्ग चौथी मधून मॉडल 'सीट जेमिनेशन', वर्ग पाचवी मधून 'रेन वॉटर हार्वेस्टिंग वर्किंग फर्स्ट मॉडल', वर्ग सहावी मधून 'डायजेस्टिव्ह सिस्टम', वर्ग सातवी मधून '३ होलोग्राम' इ. तयार केलेले सायन्स मॉडेलच्या विजयी झालेले मॉडल्स होते. मॉडेल तयार केलेल्या विद्यार्थ्यांना मेडल व सर्टिफिकेट देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सहकार्य केले.

# साखरीटोला ते बीजेपार मार्गावरील पूल धोकादायक

## जीर्ण पुल दतोय अपघाताला आमंत्रण



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**सालेकसा :** तालुक्यातील साखरीटोला ते बीजेपारकडे जाणाऱ्या रस्त्यावर वारकरीटोला गावाजवळ नाल्यावर पुल आहे. सदर पुल जीर्ण असल्याने जर्जर अवस्थेला आला आहे. अनेक ठिकाणाहून या पुलाला भेगा पडलेल्या आहेत. त्यामुळे रहदारी करणाऱ्यासाठी हा पुल धोकादायक ठरत आहे. असे असले तरी या पुलाशिवाय पर्याय नसल्याने पुलावरून जीवघेणी वाहतूक सुरू आहे. याकडे साबां विभाग व परिसरातील जनप्रतिनिधी दुर्लक्ष करीत आहे. यामुळे एखाद्या मोठ्या अपघातानंतरच झोप उघडणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

साखरीटोला-बिजेपार मार्गावरील वारकरीटोला शिवारात असलेला मागील अनेक वर्षांपासून जीर्ण अवस्थेला आहे. दिवसेंदिवस हा पुल जर्जर होत असून प्रवास करणाऱ्यांसाठी धोकादायक ठरत आहे. मात्र परिसरातील नागरिक जीव मुठीत घेऊन प्रवास करणे भाग पडत होते. या पुलाच्या अवस्थेला अनेकदा प्रशासन व जनप्रतिनिधींना तक्रार करण्यात आली. परंतु, यातत्याने दुर्लक्ष करण्यात आले. बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांना सदर धोकादायक पूल तोडून नवीन पूल तयार करण्याची मागणी देखील करण्यात आली. परंतु, मागणीला विभागाकडून केराची टोपली दाखविण्यात आली. यामुळे परिसरातील नागरिकांना या जीर्ण पुलावरून प्रवास करणे भाग पडत होते. त्यामुळे विभागाचे अधिकारी व जनप्रतिनिधी मोठ्या अपघातानंतरच दखल घेणार का? असा प्रश्न संतप्त नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. याकडे लक्ष देवून जुने पुल तोडून या ठिकाणी नविन पुलाचे बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### पिल्लर तुटला; वाहतूक बंद

**वारकरीटोला परिसरातील पुल जीर्ण व जर्जर झाला असतानाही वाहतूक सुरू होते. पर्यायी मार्गाने प्रवास करताना १० ते १२ किमीचा फेरा मारावा लागतो. त्यामुळे हा पुल साखरीटोला, बिजेपारसह परिसरातील गावांसाठी वाहतूकीच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचा ठरत होता. त्यातच जीर्ण पुलाला पिल्लरला आधार होता. ७ जानेवारी रोजी हा पिल्लर कोसळला. त्यामुळे पुलावरून सुरू असलेली वाहतूक बंद पडली आहे. परिणामी या मार्गावरून प्रवास करणारे प्रवासी व नागरिक १० ते १२ किलोमीटरचा फेरा मारून प्रवास करीत आहेत.**

# टॅबचा वापर करून भविष्य उज्वल घडवावे : आ. अग्रवाल

## महाज्योती मार्फत २९ विद्यार्थ्यांना टॅबचे वितरण



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**गोंदिया :** सध्याचे जग हे स्पर्धेचे आहे. या स्पर्धेच्या काळात टिकता यावे यासाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागाद्वारे गरीब व गरजू विद्यार्थ्यांना महाज्योती मार्फत टॅबचे मोफत वितरण करण्यात येते. सदर टॅबचा विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासक्रमासाठी सदूपयोग करुन आपले भविष्य उज्जवल करावे, असे प्रतिपादन आमदार विनोद अग्रवाल यांनी केले.

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आयोजित कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या कार्यक्रमास जिल्हा माहिती अधिकारी अंजु कांबळे-निमसरकर, दिशा गेडाम, लंजे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अशोक लंजे व इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक किशोर भोयर मंचावर उपस्थित होते.

प्रास्ताविक इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक किशोर भोयर यांनी केले. प्रास्ताविकातून त्यांनी ११ वी विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या व जे विद्यार्थी मेडिकल, इंजिनियरींग, आयआयटी या उच्च शिक्षणासाठी जेईई, नीट, एमएच-सीआयटीची परीक्षा देत आहेत, परंतू गरीब विद्यार्थी महागडे कोचिंग क्लास लावू शकत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी महाज्योतीने ऑनलाईन प्रशिक्षण सुरु केले असून पात्र विद्यार्थ्यांना मोफत टॅब देण्याचा निर्णय घेतला आहे, असे सांगितले.

यावेळी जिल्हा माहिती अधिकारी अंजू कांबळे-निमसरकर, अशोक लंजे यांनी विद्यार्थ्यांना देण्यात आलेला टॅबचा वापर हा अभ्यासासाठीच करावा यासह विद्यार्थ्यांनी नेहमी विनयशील राहावे असे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन समाज कल्याण निरीक्षक स्वाती कापसे तर उपस्थितांचे आभार आशिष जांभूळकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंकुश अतकरे, नितीन साळुंखे, देवदास बनकर, महेश चौधरी, अमोल राऊत, लक्ष्मण खेडकर, राजेश मुधोळकर यांचेसह क्रिस्टल व एस-२ कंपनीचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**गोंदिया :** शासनाने प्रतिबंधित केलेला नायलॉन मांजा साठवून त्याची विक्री करीत असताना पोलिसांनी धाड घालून महिलेच्या घरातून नायलॉन मांजाच्या चार चक्री जप्त केल्या आहेत. शहर पोलिस ठाण्यांतर्गत शास्त्री वॉर्डातील लक्ष्मी राइस मिलजवळील परिसरात ७ जानेवारी रोजी ही कारवाई करण्यात आली आहे.

सविस्तर असे की, शास्त्री वॉर्डातील लक्ष्मी राइस मिलजवळ राहणारी परवीन मो. आरिफ शेख (४५) ही आपल्या राहत्या घरात शासनाने प्रतिबंधित केलेला नायलॉन मांजा बाळगून त्याची विक्री करीत होती. याबाबत माहिती मिळताच सहायक फौजदार कवलपालसिंग भाटिया यांच्यासह पथकाने परवीन शेख हिच्या घरी धाड टाकली. घराची झडती घेतली असता हॉलमधील सोफ्याखाली प्लास्टिकच्या पिशवीत ठेवलेल्या प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या चार चक्री आढळून आल्या. या चक्रींची किंमत चार हजार रुपये असून पोलिसांनी जप्त केल्या आहेत. या प्रकरणी आरोपी महिला परवीन शेख हिच्याविरुद्ध पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ च्या कलम ३, १५, भारतीय न्याय संहिताच्या कलम २२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कामगिरी पोनि. किशोर पर्वते व डी. बी. पथकाच्या कर्मचाऱ्यांनी केली.

# आनंद मेळाव्यातून विद्यार्थी व्यावसायिकदृष्ट्या प्रगल्भ होतात : सौ. सविता पुराम

## शासकीय आश्रम शाळा पुराडा येथे आनंद मेळावा उत्साहात




**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**देवरी :** व्यावसायिकदृष्ट्या आनंद मेळाव्याच्या माध्यमातून बालकांना शाळेमधूनच व्यवसायाची सवय लागते, व्यवसाय ज्ञान, आर्थिक ज्ञान व लोकांशी बोलण्याची कला विद्यार्थ्यांना आनंद मेळाव्याच्या माध्यमातून अवगत होत असते व यामुळे अतिशय मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांच्या फायदा होत असतो, आदिवासी विद्यार्थी भविष्यात व्यावसायिक होण्यासाठी अश्या मेळाव्याची अत्यंत आवश्यकता आहे असे प्रतिपादन या वेळी उद्घाटक म्हणून बोलताना माजी सभापती सौ सविताताई पुराम जिल्हा परिषद सदस्या यांनी

शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा पुराडा येथे शनिवार दिनांक १०.१.२०२६ ला आयोजित आनंद मेळाव्याचे उद्घाटन प्रसंगी बोलताना सांगितले. शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा पुराडा येथे दरवर्षी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात येत असून शाळेचे प्राचार्य कमल कापसे यांच्या अध्यक्षतेखाली आनंद मेळावा आयोजित करण्यात आला होता त्यामध्ये विद्यार्थ्यांनी अनेक खाद्यपदार्थांचे व वस्तूंचे स्टॉल लावले होते त्यामध्ये संपूर्ण स्टॉलवरची विक्री अगदी तासाभरातच झाली, विद्यार्थ्यांना आर्थिक व्यवहार करण्याची कसब तसेच ग्राहकाशी संवाद साधण्याची कला, व्यवसायाच्या माध्यमातून जीवनात यशस्वी होण्यासाठी या बाबी अतिशय महत्त्वपूर्ण असल्याचे प्राचार्य कमल कापसे यांनी सांगितले या आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांचे ४२ स्टॉल लावण्यात आलेले होते त्यामध्ये सांबार वडा, इडली, डोसा, पास्ता, आप्पे, नूडल्स, पुरी भाजी, आलूपोहा, चनापाणी, चिवडा व तुरीच्या शेंगा, चहा, दाळवडे, लवकीचे, कोचईपान वडी, कॉफी, फिंगर, मोड आलेले हिरवे मुंग, सुरण, ऊस तसेच अनेक पदार्थ या आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विक्रीसाठी ठेवलेले होते त्यामधून हजारो रुपयांची विक्री विद्यार्थ्यांनी केली व त्या विक्रीतून मिळणारा नफा हा आपल्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी उपयोग करणार असल्याचे स्टॉल लावलेले विद्यार्थ्यांनी सांगितले या आनंद मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीकृष्ण टप्पे, सदस्य शोभेलाल उईके, अधीक्षक अजय सोनूले, अधिक्षिका पौर्णिमा जोशी, उच्च माध्यमिक शिक्षक राजेश हट्टेवार, मेघा धोपते, वैयजंती नेणावत, वैशाली खोंडे, आशा धुर्वे, ओमप्रकाश मडावी माध्यमिक शिक्षक राजू भक्ता, सुजाता मेश्राम, पवन वंजारी, प.प्रा.शि. विजयकुमार टेंभरे, प्राथमिक शिक्षक मोरेश्वर धवणे, सुरेखा कोरे, अरविंद कुथीर, नाईक, तसेच मंदाताई देशमुख, जयदेव भेंडारकर, मयुर राठोड, पुनम, व शाळेतील इतर सर्व कर्मचारी व मोठ्या प्रमाणात पालक विद्यार्थी या आनंद मेळाव्यात सहभागी होऊन अनेक व्यंजनांची खरेदी करून खाण्याच्या आनंद लुटला.

# तंबाखुविरोधात जनजागृती



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**गोंदिया :** जिल्ह्यात तंबाखू मुक्त युवा अभियान ३.० राबविण्यात येत आहे. यातंर्गत जिल्ह्यातील सार्वजनिक ठिकाणे, शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, विविध कार्यालये तंबाखूमुक्त करणे आणि तरुणांमध्ये तंबाखूच्या सेवनाने होणाऱ्या दुष्परिणामांबद्दल जागरूकता निर्माण केली जात आहे. यानुरूप ग्राम पंचायत ढाकणी परिसरात तंबाखुविरोधात जनजागृती करण्यात आली.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्य विभागात राष्ट्रीय तंबाखु नियत्रंण कार्यक्रमाच्या अनुशंगाने विशेष पथक के.टी.एस.शासकीय सामान्य रुग्णालय येथे कार्यरत आहे. पथकामार्फत जिल्ह्यात विविध ठिकाणी तंबाखू मुक्तीसाठी विविध कार्यक्रमे व उपक्रमे राबविली जात आहे. ज़िल्हा शल्य चिकित्सक डॉ.पुरुषोत्तम पटले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार व अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.तृप्ती कटरे यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राष्ट्रीय तंबाखु नियत्रंण कार्यक्रमातील जिल्हास्तरीय पथकाने तालुक्यातील ग्रामपंचायत ढाकणी येथे भेट देवुन तंबाखू मुक्त युवा अभियान ३.०' अभियान व कोटपा कायद्याविषयी माहीती देवुन तंबाखू मुक्त गाव करण्याविषयी मार्गदर्शन केले. तंबाखू मुक्त गाव घोषित करण्याचे निकष समजावून सांगण्यात आले.कोटपा कायदा २००३ अंतर्गत कलमांची माहिती पुस्तिका व जनजागृती साहित्ये सरपंच भावना पालांदुरकर यांना देऊन जनजागृती करण्यात आली. यावेळी जिल्हा सल्लागार डॉ.ज्योती राठोड, मनोवैज्ञानिक सुरेखा आझाद मेश्राम, सामाजिक कार्यकर्ता संध्या शंभरकर, दंत तंत्रज्ञ यश जयस्वाल, दंत सहाय्यक विवेकानंद कोरे उपस्थित होते.

युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा जिल्हा
सोमवार दि.१२ जानेवारी २०२६

## साकोली येथील दिव्यांग विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**साकोली :** समग्र शिक्षा अभियान अंतर्गत पंचायत समिती साकोली येथील जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथ. शाळा सेंदूरवाफा क्र. १ येथील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल गुरूवार ता. ०८ जाने. ला साकोली येथून बॉटनिकल गार्डन चंद्रपूर व सैनिकी स्कूल चंद्रपूर येथे भेट देण्याकरता रवाना झाली.

यामध्ये साकोली केंद्राचे केंद्रप्रमुख ए. बी. मेश्राम यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व आपल्याकडून खाऊ करीता बिस्कीटचे वाटप केले. याप्रसंगी साकोली गटसाधन केंद्राचे सर्व कर्मचारी आणि पालकवर्ग हे विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्याकरिता उपस्थित होते. विशेष म्हणजे या शैक्षणिक सहलीमध्ये सहभागी झालेल्या सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्साह व आनंद दिसून आला.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# पेट्रोल टाकून दाम्पत्याला जाळण्याचा प्रयत्न

■ २ सराईत गुन्हेगारांना अटक ■ पोहरा येथील घटना



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**लाखनी :** तालुक्यातील पोहरा येथे रस्ता अडवून उभ्या असलेल्या तरुणांना दुचाकी बाजूला करण्यास सांगणे एका दाम्पत्याला चांगलेच महागात पडले. या क्षुल्लक कारणावरून संतापलेल्या दोन सराईत गुन्हेगारांनी पती-पत्नीसह त्यांच्या पुतण्यावर पेट्रोल ओतून त्यांना जिवंत जाळण्याचा धक्कादायक प्रयत्न केला. याप्रकरणी लाखनी पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन्ही आरोपींना अटक केली.

पोहरा येथील रहिवासी विरांगणा विलास मेश्राम आणि त्यांचे पती पायी जात असताना ही घटना घडली. पोहरा परिसरात धम्मराज नेमीचंद मेश्राम (३२) आणि भीमराज नेमीचंद मेश्राम (२९) दोन्ही रा. सेलोटी यांनी दुचाकी रस्त्याच्या मधोमध उभी केली होती. मेश्राम यांनी त्यांना गाडी बाजूला घेण्याची विनंती केली असता, आरोपींनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. आम्ही नुकतेच कारागृहातून बाहेर आलो आहोत, आमचे कोणी काही वाकडे करू शकत नाही, अशी धमकी देत आरोपींनी स्वतःजवळील बाटलीतील पेट्रोल दांपत्याच्या अंगावर ओतले.

आरोपींनी एवढ्यावरच न थांबता दांपत्याला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली आणि आगपेटी काढून त्यांना पेटवण्याचा प्रयत्न केला. यावेळी पती-पत्नीला वाचवण्यासाठी आलेला त्यांचा पुतण्या याच्यावरही आरोपींनी पेट्रोल ओतून त्याला जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. पीडित महिलेच्या तक्रारीवरून आणि वैद्यकीय अहवालाच्या आधारे लाखनी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. दोन्ही आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांना अटक करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# ट्रकच्या धडकेत दुचाकीचालक ठार

■ भंडारा शहरातील घटना ■ ट्रक घटनास्थळावरून पसार

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** शहरातील विद्या नगर परिसरासमोर आज रविवारी पहाटे वृत्तपत्र टाकणारे शंकर भोजलाल पटले यांचे अपघाती निधन झाले. नेहमीप्रमाणे मोटार सायकलने वृत्तपत्र वितरणाचे काम आटोपून भोजापूरकडे जात असताना नागपूर कडून विरुद्ध दिशेने ओव्हरटेक करणाऱ्या भरधाव ट्रकने त्यांना जोरदार धडक दिली. अपघातानंतर संबंधित ट्रकचालक घटना स्थळावरून पळ काढून थेट बीटीबी मंडी येथे माल खाली करण्यासाठी गेल्याची माहिती समोर आली आहे. या भीषण अपघातात शंकर पटले यांचा जागीच मृत्यू झाला तसेच शंकर पटले यांच्या टीव्हीएस स्कुटी (एमएच ३६ ऐएस २४७०) या गाडीचा चुराडा झाला.





या हिट अँड रन प्रकरणात पोलिसांकडून दिरंगाई होऊ नये आणि आरोपीला तात्काळ अटक करण्यात यावी, या मागणीसाठी आज दुपारी ४ वाजता शहर पोलीस ठाणे, गांधी चौक, भंडारा येथे सर्व प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, वेब पोर्टल, यूट्यूब पत्रकार तसेच वृत्तपत्र विक्रेता संघाचे सदस्य एकत्र आले. आरोपी ट्रकचा लवकरात लवकर छडा लावून चालकाला जेरबंद करावे, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी पोलीस उपनिरीक्षक ठवकर यांनी उपस्थितांना माहिती देताना सांगितले की, संशयित ट्रकचा शोध घेण्यासाठी विशेष पथक लाखनीकडे रवाना करण्यात आले असून, लवकरच आरोपींना ताब्यात घेतले जाईल. पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू आहे.

मृतक शंकर पटले यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत सामान्य होती. त्यांनी नुकतेच कुटुंबासाठी एक वाहन विकत घेतले होते. त्यांच्या पश्चात पत्नी आणि एक मुलगी असा परिवार असून, त्यांच्या अकाली निधनाने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे संपूर्ण वृत्तपत्र विक्रेता आणि पत्रकार बांधवांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## उद्या टॅलेंट सर्च परीक्षेचा पारितोषिक वितरण सोहळा

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**मोहाडी :** शिक्षणमहर्षी स्व.मनोहरभाई पटेल यांच्या जयंती निमित्त मोहाडी तालुक्यातील विविध कनिष्ठ महाविद्यालयात घेण्यात आलेल्या टॅलेंट सर्च परीक्षेचा पारितोषिक वितरण सोहळा १३ जानेवारीला दुपारी १२.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

नटवरलाल जशभाई पटेल महाविद्यालय मोहोडी येथील सभागृहात आयोजित या पारितोषिक वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेंद्र पवार हे राहतील.विशेष मार्गदर्शक म्हणून गोपालकृष्ण मांडवकर, एल.आय. सी.तुमसरचे विकास अधिकारी नरेश बाबू दिपटे उपस्थित राहणार आहेत.या टॅलेंट सर्च परीक्षेत करडी,मोहाडी, उसर्रा, जांब, कांद्री, लोहारा,खापा,आंधळगाव, बेटाळा, वरठी, खमारी,हरदोली येथील शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.या कनिष्ठ महाविद्यालय व आय.टी.आय.मधील विजेत्या ७५ विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम, सन्मानचिन्ह तसेच सहभागी सर्व विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे.या परीक्षेत सहभागी शाळेतील सर्व प्राचार्यांचा या वितरण सोहळ्यात सत्कार करण्यात येणार आहे. विजेत्या विद्यार्थ्यांनी नटवरलाल जशभाई पटेल महाविद्यालय मोहाडी येथे १३ जानेवारीला दुपारी १२.३० वाजता उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## लाखनी येथे रक्तदानाचा महासंकल्प; जगद्गुरु रामानंदाचार्यजी संस्थेचा अनोखा सामाजिक उपक्रम

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**लाखनी :** अनंत विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री नरेंद्राचार्यजी महाराज, श्रीक्षेत्र नानिजधाम संस्थानामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची परंपरा यंदाही जोमात कायम ठेवत लाखनी तालुक्यात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. देहदान, नेत्रदान, अवयवदान, कच्चे बंधारे बांधणे तसेच दरवर्षी नियमितपणे घेण्यात येणाऱ्या रक्तदान शिबिरांच्या परंपरेतून संस्थान समाजहिताचा वसा जपताना दिसून येत आहे. आज दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी ग्रामीण रुग्णालय, लाखनी येथे आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिराला समाजातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तब्बल १०० रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतेचे दर्शन घडवले.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन लाखनी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा त्रिवेणीताई पोहरकर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी स्त्रीरोगतज्ञ डॉ. मनोज आगलावे, डॉ. चंद्रकांत निंबरते, डॉ. मिलिंद भुते, डॉ. बंडू चौधरी, गिरीश बावनकुळे, मुरमाडीचे सरपंच शेषराव धोंडू वंजारी, नगरसेवक संदीप भांडारकर, महेश आकरे, अश्विन धर्मसारे, प्रा. अजिंक्य भांडारकर, प्रा. मेश्राम,




अशोक हजारे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच शासकीय जिल्हा रक्तपेढीचे प्रमुख डॉ. सौरभ गोस्वामी, रक्तपेढीचे पी.आर.ओ. राजेंद्र नागदेवे यांनी रक्तसंकलनाची जबाबदारी सांभाळली. रामानंदाचार्य संप्रदायाकडून मुन्नालाल मोटघरे (छत्तीसगड पीठ सहायक), संतोष भाऊ भुरे (जिल्हा पीठ निरीक्षक), आशिष बालपांडे (जिल्हा युवा अध्यक्ष), नितेश वंजारी (जिल्हा सेवा अध्यक्ष), वर्षाताई राजू फंदे (जिल्हा महिला सेवा अध्यक्ष), विष्णुदासजी तळवेकर (जिल्हा प्रसिद्धी प्रमुख), प्रशांत कुरंजेकर (जिल्हा ब्लड युनिट प्रमुख), चंद्रशेखर कुंभरे (तालुका सेवा अध्यक्ष), श्रावण कोठेकर (तालुका कार्यवाह), अर्चना विष्णु तळवेकर, माधुरी हजारे (तालुका महिला सेवा अध्यक्ष) यांच्यासह संपूर्ण जिल्हा व तालुका समिती तसेच तालुक्यातील सर्व सेवा केंद्रांचे अध्यक्ष, गुरुबंधू व गुरुभगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शैलेश साठवणे, शिवानी फंदे, आयुष गायधने, पियुष तळवेकर, अंशुल फंदे, निलेश भोयर, अनमोल खंडाईत, आशिष भस्मे, मोहित फंदे यांनी परिश्रम घेतले. 'सेवा हेच साधना' या ब्रीदवाक्याचा प्रत्यय देणाऱ्या या उपक्रमामुळे लाखनी तालुक्यात सामाजिक कायार्ला नवा आयाम मिळाला असून जगद्गुरु रामानंदाचार्य संस्थानाची सामाजिक बांधिलकी पुन्हा एकदा ठळकपणे अधोरेखित झाली आहे.

## नगराध्यक्ष सागर गभणे यांच्या हस्ते मोक्षधाम येथील समाजभवनाचे भूमिपूजन

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**तुमसर :** आमदार राजुभाऊ कारेमोरे यांच्या प्रयत्नाने वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत नगरपरिषद तुमसर हद्दीतील स्मशानभूमि अंतर्गत समाज भवन बांधकामाचे उदघाटन आज दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी नगराध्यक्ष इंजि. सागर गभने यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी मोक्षधाम सेवा समितीचे कार्यकारी अध्यक्ष बाल्या मदनकर,सचिव अनिल कारेमोरे, विष्णू जोशी, सुशील आगाशे, पंढरीनाथ धुर्वे, लालु हिसारीया, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता वैद्य मेडम, नगर परिषद चे बांधकाम अभियंता निलेश भगत, जितू देवडे,



अभय भेदे प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी नगराध्यक्ष सागर गभने यांनी कामाची गुणवता योग्य ठेऊन बांधकाम वेळेत पूर्ण करावे अशी सूचना यावेळी केली. तसेच मोक्षधाम तुमसर येथे आणखी आवश्यक नागरी सोयी सुविधांसाठी लेखी निवेदन द्यावे अशा सुचना समितीच्या पदाधिकाऱ्यांना केल्या.

## अंशकालीन कामगाराच्या नेमणुकीसाठी सेवा सहकारी संस्थानी १५ जानेवारीपर्यंत प्रस्ताव सादर करावेत

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** अंशकालीन सफाई कामगार व जिल्हा प्रयोग शाळेकरीता एक अकुशल कामगार ( मदतनीस) असे दोन कामगाराची आवश्यकता आहे. सदर कामगार हे १२ महिन्या कालावधी करीता अपेक्षीत असून हे काम सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थाना २८ ऑगस्ट, २०२४ शासन निर्णयानुसार कामे वाटप समीतीमार्फत घ्यावयाची आहेत. सेवा सहकारी संस्थानी कामाचे प्रस्ताव सादर करावेत.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,भंडारा तसेच भंडारा जिल्हा सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था संघ मर्या,भंडारा यांचे कार्यालयातील संबधीत कक्षातही त्यांनी पाठविलेल्या पत्राच्या प्रती पाहावयास उपलब्ध आहेत.

तरी खलील अटी व सेवाशर्ती मान्य असल्यास व त्याची पुर्ती करण्यास तयार असलेल्या, जिल्हयातील पात्र सेवा सहकारी संस्थानी कामाचे प्रस्ताव सादर करावेत.प्रस्तावा सोबत खालील प्रपत्रे जोडणे आवश्यक आहेत. तसेच काम देणा-या संस्थेच्या अटी व शर्ती हया कार्यालयाचे नोटीस बोर्डावर उपलब्ध आहेत.

संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र ,सेवा सोसायटीच्या बैक पासबुकची मागील १ वर्षाची उलाढाल दर्शविणा-या पानाची प्रत (पासबुक च्या पहील्या पानाच्या झेरॉक्झ. प्रतिसह सेवा सोसायटीने मागील १ वर्षात केलेल्या कामाबाबतचे कायार्देश व अनुभवाची प्रपत्रे यांच्या प्रती,.सेवा सोसायटीने केलेल्या सर्व नियीमत वार्षिक लेखा प्रशिक्षणाच्या प्रती

सेवा सोसायटी कार्यरत असलेल्या ठिकाणचे Address proof ( उदा.टेलीफोन /इलेक्ट्रीक बील/वार्ड, मेंबर्सचा दाखला ई.ची प्रत)सेवा सोसायटीने सदस्यांना दिलेले ओळखपत्रे व सर्व सदस्य क्रियाशिल असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडावे (दोन्ही प्रमाणपत्र वेगवेगळे असावे ) संस्थेचे उदेश व उपविधीची प्रत सोबत जोडावी (उपवीधीची प्रत अपुरी नसावी). संस्थेने नमुद केलेली माहीती व सोबत जोडलेलया सर्व प्रपत्रातील माहीती सत्य. असल्याबाबतचे सेवासोसायटीचे अध्यक्षांचे प्रमाणपत्र सोबत जोडावे. संस्थेमधील सर्व सभासदांचे चालु असलेले एम्पलॉयमेंट कार्ड सेवा सहकारी संस्थेचे सभासद शासकीय किंवा निमशायकीय नोकरीस नसल्याचे प्रमाणपत्र.

तरी वरील कामाच्या अटी व शर्ती पुर्ण करीत असलेल्या भंडारा जिल्हयातील इच्छुक व पात्र सेवा सहकारी संस्थानी आपले परीपुर्ण व स्वतंत्र प्रस्ताव संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्रासह व सर्व अन्य. आवश्यक प्रमाणपत्रांसह जिल्हा कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केद्र, भंडारा यांच्याकडे दि. १५ जानेवारीपर्यंत कार्यालयीन वेळेत ( सायंकाळी ५.४५ ) पर्यत सादर करावेत . त्यानंतर प्राप्त. होणाऱ्या प्रस्तावांचा अथवा प्राप्त. प्रस्तावातील अन्य. प्रपत्राचा स्वीकार केला जाणार नाही,असे सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, भंडारा तथा सदस्य. सचिव कामे वाटप समीती हे कळविले आहे.

## कुरमुडा येथील क्रीडा स्पर्धेत चिखली शाळेच्या मुलांचा डंका

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**नाकाडोंगरी :** डोंगरी बु. केंद्रांतर्गत मौजा कुरमुडा येथे आयोजित तीन दिवसीय क्रीडा स्पर्धेत जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा, चिखली येथील माध्यमिक गटातील मुलांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. या घवघवीत यशामुळे चिखली शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, खेळाडूंनी शाळेसह गावाचे नाव जिल्ह्याच्या नकाशावर उज्वल केले आहे.

**मैदानात चिखलीचा दबदबा**

कुरमुडा येथे संपन्न झालेल्या या भव्य

माध्यमिक गटात पटकाविला प्रथम क्रमांक...



क्रीडा स्पर्धेत परिसरातील अनेक शाळांनी सहभाग नोंदवला होता. विविध खेळांमध्ये चिखली शाळेच्या मुलांनी सुरुवातीपासूनच चुरशीची लढत दिली. शारीरिक कौशल्य, सांघिक समन्वय आणि जिद्दीच्या जोरावर माध्यमिक गटातील मुलांनी अंतिम सामन्यात प्रतिस्पर्ध्यावर मात करत विजेतेपद आपल्या नावावर केले.

**गावात जल्लोषात स्वागत**

विजेत्या मुलांचे गावात आगमन होताच ग्रामस्थांनी त्यांचे जंगी स्वागत केले. मुलांच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, सर्व शिक्षकवृंद आणि गावकऱ्यांनी त्यांचे विशेष कौतुक केले. संपूर्ण गावात विजयाचा जल्लोष साजरा करण्यात आला.

# परसोडी येथे आकाशातून पडले दगड, नागरीकांमध्ये भीती

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** निसर्गाच्या अनाकलनीय घटनांनी मानवाला नेहमीच चकित केले आहे, मात्र भंडारा जिल्ह्यातील परसोडी परिसरात घडलेल्या एका घटनेने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडवून दिली आहे. आकाशातून अचानक पडलेल्या दोन रहस्यमय वस्तूंमुळे नागरिक भयभीत झाले आहेत. सोबतच कुतूहलही निर्माण झाले आहे. शुक्रवारी संध्याकाळच्या सुमारास घडलेली ही घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली. या वस्तू पोलीस प्रशासनाच्या स्वाधीन करण्यात आल्या.

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, परसोडी येथील सुगत बौद्ध विहार परिसरात राहणारे किशोर रमेश वाहने (वय ५० वर्षे) यांनी या घटनेची अधिकृत माहिती पोलीस ठाण्यात दिली. घटना १० जानेवारी रोजी सायंकाळी ७ ते ७:१५ वाजेच्या सुमारास घडली. परसोडी गावाजवळील एका मोकळ्या ले-आउटच्या जागेत काही लहान मुले थंडीपासून बचाव करण्यासाठी शेकोटी पेटवून हात शेकत बसली होती. त्याचवेळी, अचानक आकाशातून काहीतरी जळत खाली येत असल्याचे मुलांच्या निदर्शनास आले. बघता बघता, अर्ध्या विटेच्या आकाराचे, सिमेंटच्या रंगाचे दोन तुकडे वेगाने जमिनीवर पडले. हे तुकडे पडताना जळत होते, मात्र जमिनीवर आदळल्यानंतर त्यांचा आवाज फारसा झाला नाही. सुदैवाने,



हे तुकडे मुलांच्या अंगावर न पडता जवळच पडल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. तसेच परिसरातील कोणत्याही मालमत्तेचे नुकसान झाले नाही.

सदर वस्तू मुलांनी सकाळी किशोर रमेश वाहने यांना दाखवल्या. त्यांनी या वस्तूंची पाहणी केली असता, त्या दिसायला सिमेंटच्या रंगाच्या परंतु वजनाला अत्यंत हलक्या असल्याचे दिसून आले. आकाशातून पडलेली कोणतीही वस्तू सामान्यतः धातूची किंवा दगडाची (उल्का) असते, मात्र या वस्तूंचे 'हलके वजन' हा चचेर्चा आणि संशोधनाचा विषय ठरला आहे. किशोर रमेश वाहने यांनी तात्काळ प्रसंगावधान राखून ११ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता हे दोन्ही तुकडे पोलीस ठाण्यात जमा केले.पोलिस ठाण्याचे पोलीस हवालीदार शिंगाडे आणि ठाणेदार भिमाजी पाटील यांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून घटनेची नोंद घेतली आहे. प्राथमिक तपासात या वस्तू मानवनिर्मित उपग्रहाचा ढिगारा आहेत की नैसर्गिक उल्कापाताचा भाग, हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही.

### आपत्ती व्यवस्थापन विभागाची तत्परता

या घटनेची माहिती मिळताच जिल्हा नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालयाला कळवण्यात आले. आपत्ती व्यवस्थापन अधिकारी अभिषेक नामदास यांनी या प्रकरणाची दखल घेत वरिष्ठ पातळीवर संपर्क साधला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, पडलेल्या वस्तूंचे नमुने सखोल तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अभिषेक नामदास यांनी दिलेल्या माहितीनुसार कलकत्ता येथील वरिष्ठ चमू तपासणीसाठी येणार आहे.परसोडी आणि संपूर्ण भंडारा जिल्ह्यात या घटनेनंतर विविध चर्चांना उधाण आले आहे. विज्ञानाच्या दृष्टीने विचार केल्यास, पृथ्वीच्या कक्षेत फिरणाऱ्या जुन्या उपग्रहांचे अवशेष अनेकदा वातावरणात प्रवेश करताना जळून खाक होतात. त्यातील काही भाग जमिनीपर्यंत पोहोचू शकतात. मात्र, हे तुकडे सिमेंटच्या रंगाचे आणि हलके का आहेत, याचे उत्तर कोलकाता येथील चमूच्या अहवालानंतरच स्पष्ट होईल. दरम्यान हा उल्कापाताचा प्रकार असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

युवाराष्ट्र दर्शन ⑥
गडचिरोली जिल्हा
सोमवार, दि.१२ जानेवारी २०२६

## बामणीत धान खरेदी केंद्राचे उद्घाटन

**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**तालुका प्रतिनिधी**

**सिरोंचा दि.१० :** आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था बामणी अंतर्गत येणाऱ्या बामणी येथील धान खरेदी केंद्राचे उद्घाटन अहेरी विधानसभा क्षेत्राचे आमदार तथा माजी कॅबिनेट मंत्री डॉ. धर्मरावबाबा आत्राम यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी राकाँचे कार्यकारी जिल्हाध्यक्ष बानय्या जनगाम, राकाँचे तालुकाध्यक्ष मधुकर कोल्लूरी, नगरसेवक सतीश भोगे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकचे उपाध्यक्ष श्रीहरी भंडारी नगरसेवक सतीश रचरालावार, वेंकटापूरचे सरपंच अजय आत्राम, मंदा शंकर, सिरकोंडाचे सरपंच लक्ष्मण गावडे, पत्रकर नागभूषनम चाकीनारपूवार, संस्थेचे अध्यक्ष चिन्नापेंटा तलांडी, राकाँ जिल्हा महिला उपाध्यक्ष वेंकटलक्ष्मी आरवेल्लीवार, नरेश सांगर्ती, दुर्गेश लंबाडी, राष्ट्रवादी काँग्रेस सोशल मीडिया प्रतिनिधी तिरुपती चिट्याला, रवींद्र कार्सपल्ली, अशोक मडावी, रामन्ना भंडारी, गणेश रच्चावार, श्रीनिवास कुळमेथे, केशव मडावी, गुंडा वेलादी, श्रीनिवास मडावी, गुत्ता वेलादी, मदनय्या रत्नागिरी व बामणी परिसरातील शेतकरी बांधव उपस्थित होते.

या परिसरात खरीप धान पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आधारभूत धान खरेदी केंद्राची नितांत आवश्यकता असताना सुरु करण्यात आले. याचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे.

# मनरेगा बचाव संग्राम अंतर्गत जिल्हा काँग्रेसचे निषेध आंदोलन

### केंद्र सरकारने १०० टक्के अनुदानासह मनरेगा योजना पूर्ववत सुरू ठेवावी - जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांची मागणी

**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**




**गडचिरोली दि.११ :** भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) ही जनतेच्या जीवनाधार योजना असताना, भाजप सरकारने ती मोडीत काढून तिच्या जागी (व्हीबीरामजी) ही नवी योजना लादण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील कोट्यवधी कष्टकरी नागरिकांचा रोजगार हिरावला जाणार असून ग्रामीण अर्थव्यवस्था उद्धवस्त होण्याच्या मार्गावर असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

या लोकविरोधी, शेतकरी मजूर विरोधी निर्णयाचा तीव्र निषेध करण्यासाठी तसेच मनरेगा योजना जुन्याच पद्धतीने, केंद्र सरकारच्या १०० टक्के अनुदानासह तात्काळ सुरू करण्यात यावी या ठोस मागणीसाठी "मनरेगा बचाव संग्राम" अभियानांतर्गत गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शिवणी येथे मनरेगा अंतर्गत करण्यात आलेल्या रस्त्याच्या कामावर उतरून भाजप सरकारच्या विरोधात निषेध आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनाचे नेतृत्व गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांनी केले.

यावेळी अखिल भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव ॲड. विश्वजीत कोवासे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आदिवासी विभागाच्या राष्ट्रीय सचिव कुसुम आलाम, शहराध्यक्ष तथा नगरसेवक सतीश विधाते, नगरसेवक श्रीकांत देशमुख, गडचिरोली तालुका अध्यक्ष वसंत राऊत, जिल्हा उपाध्यक्ष शंकरराव सालोटकर, नेताजी गावतुरे, हरबाजी मोरे, पंचायत राज सेल जिल्हाध्यक्ष नरेंद्र डोंगरे, अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष रजनीकांत मोटघरे, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष नितेश राठोड, रोजगार सेल कार्याध्यक्ष पुष्पलता कुमरे, परिवहन सेल अध्यक्ष रुपेश टिकले, सहकार सेल अध्यक्ष अब्दुल भाई पंजवानी यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मनरेगा योजनेत काम करणारे कामगार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे म्हणाले की, मनरेगा ही केवळ रोजगार योजना नसून ग्रामीण भारताचा जीवनाधार आहे. भाजप सरकारचा हा निर्णय गरीबविरोधी असून काँग्रेस पक्ष जनतेच्या हक्कासाठी सातत्याने संघर्ष करीत राहील.

# भारतातील झेन-जी राष्ट्रप्रथम भावनेत कार्यरत

### वीरेंद्र सोलंकी : अखिल भारतीय विद्यार्थी परिषद विदर्भ प्रांत अधिवेशन

**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**




**गडचिरोली दि.११ :** आज जगात सर्वत्र संघर्षाची स्थिती निर्माण झाली असून, त्याला कारणीभूत अमेरिकेतील डीप स्टेट आहेत. या डीप स्टेटच्या माध्यमातून अनेक राष्ट्रे अस्थिर करण्याचा प्रयत्न सुरू आहे. भारताच्या शेजारी नेपाळ, श्रीलंका, बांगलादेश हे याचे उदाहरण आहेत. भारतातही या प्रकारचे प्रयत्न सुरू असून देशातील तरुणांना हाताशी धरून हे प्रयत्न सुरू आहेत, पण भारतातील युवा झेन-जी राष्ट्रप्रथम या मानसिकतेचे असून, राष्ट्रभक्त युवा विद्यार्थी परिषदच्या माध्यमातून हे षड्यंत्र निष्फळ ठरवतील, असे विश्वास अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रीय महामंत्री वीरेंद्र सोलंकी यांनी व्यक्त केला.

गडचिरोलीत अभाविपचे ५४ वे प्रांत अधिवेशन सुरू असून, शनिवारी शहरातील पंडित रवी शंकर रंगमंचावर हे अधिवेशन झाले. या वेळी आयोजित जाहीर सभेत ते मार्गदर्शन करत होते यावेळी व्यासपीठावर अभाविपचे प्रांत अध्यक्ष डॉ.श्रीकांत पवंत, प्रांत मंत्री देवाशीष गोसकर, राष्ट्रीय मंत्री पायल किनाके व मान्यवर उपस्थित होते.

सोलंकी यांनी युवकांना रोजगार मागणारे नाही तर रोजगार तयार करणारे युवक निर्माण झाले पाहिजेत, असे आवाहन केले. तसेच नवीन शैक्षणिक धोरण देशभरात एकसमान लागू करावे, असे मत त्यांनी व्यक्त केले. आजची छात्रशक्ती देशात कार्यरत असलेल्या समाजविघातक शक्तींना तोड देत असून, यात गावागावातील छात्रशक्तीचा मोठा सहभाग आहे, असे ते म्हणाले.

या जाहीर सभेत विदर्भातील राज्यमंत्री, खासदार, आमदार, माजी मंत्री, विविध संघटनांचे पदाधिकारी, विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खरीप हंगामातील धानाचे चुकारे तत्काळ द्या: फाये

**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**तालुका प्रतिनिधी**

**कुरखेडा दि.११ :** खरीप हंगामात शेतकऱ्यांनी धान्याची विक्री करून एक महिन्याचा कालावधी लोटून सुद्धा शेतकऱ्यांना विकलेल्या धान्याचे चुकारे मिळाले नसल्याने शेतकरी बांधवाचे प्रलंबित धान्य चुकारे त्वरित देण्यात यावे, अशी मागणी भाजपचे तालुकाध्यक्ष आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था कुरखेडा उपाध्यक्ष चांगदेव फाये यांनी आदिवासी मंत्री डॉ. अशोक उईके यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

जिल्ह्यात १ डिसेंबरपासून आधारभूत धान्य खरेदी केंद्र सुरू झाले. काही खरेदी केंद्रावर २ ते ३ हजार क्विंटल धान खरेदी झाली आहे. सरासरी प्रत्येक खरेदी केंद्रावर १०० ते २०० शेतकऱ्यांनी धान विक्री केली आहे. मात्र धान विक्रीला एक महिन्याच्या कालावधी होऊनही धान्य विक्रीचे पैसे शेतकऱ्यांना अजूनही मिळाले नसल्याने आधीच संकटात असलेल्या शेतकऱ्यांना पुढील रब्बी हंगाम कसा करायचा या विवचनेत शेतकरी वर्ग सापडला आहे. यामुळे भाजपचे तालुकाध्यक्ष फाये यांनी ही बाब प्रा. उईके यांच्या निदर्शनात आणून देऊन त्यांना शेतकऱ्यांचे चुकारे खात्यात जमा करण्यासंदर्भात निवेदन दिल आहे.

## बाळकृष्ण सावसाकडे यांची उपोषण स्थळी भेट




**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि.११ :** गडचिरोली येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर दि.२४ डिसेंबर २०२५ पासून कुरखेडा तालुक्यातील अंगारा येथील उपोषणकर्ते त्रिभुवन बाळबुद्धे यांचे आजतागायत दि.११ जानेवारी पर्यंत १८ व्या दिवशीही प्रशासनाने कोणत्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. 'अन्नत्याग उपोषणाची' माहिती मिळताच आम आदमी पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपोषणस्थळी दाखल झाले समस्या जाणून घेतल्या.

उपोषणात मागण्या पुर्ण न झाल्यास सखोल चौकशी करून न्याय देण्यात यावे अन्यथा आपचे ज्येष्ठ नेते बाळकृष्ण सावसाकडे यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात येत आहे

आंदोलनस्थळी सेवानिवृत्त शिक्षक आघाडी जाणिकरावजी ननावरे, कामगार आघाडी दिवाकर साखरे, तूळशिराम मोहूर्ले, संदीप साहारे, विजय भेंडारे, संतोष कोडापे आपचे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# समाजसेवक व साहित्यिक गो.ना.मुनघाटे

**प्रा.डॉ.रवींद्र विठोबा विखार**

**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि.११ :** गो.ना.या नावाने प्रसिद्ध असलेले गोविंदराव नारायणराव मुनघाटे साहेबांचा जन्म गडचिरोली (पूर्वीचे चंद्रपूर) जिल्ह्यातील गोगाव या छोट्याशा गावात १२ जानेवारीला झाला. साहेबांचे वडील तलाठी होते. वैरागड या लहानशा गावात साहेबांचे प्राथमिक शिक्षण झाले. जन्मगावी माध्यमिक शिक्षणाची सोय नसल्यामुळे गडचिरोली पर्यंत दररोज पायपीट करून मॅट्रिक पर्यंत आपले शिक्षण पूर्ण केले.

पदव्यांचे कागदोपत्री शिक्के साहेबांच्या संग्रही नसले तरी पदव्यांचे मोल साहेबांनी जाणले आणि पदव्यांचा पर्याय म्हणून वाचन, लेखन, चिंतन व मनन त्यांनी ओळखले. मराठी साहित्याचा साहेबांना दांडगा अभ्यास होता. साहेबांचे साहित्य कविता, ग्रंथ, कादंबरी, नाटक, विविध लेखांच्या स्वरूपात प्रसिद्ध आहेत.

साहेबांनी प्रथमतः १९५६ ते १९६१ पर्यंत महात्मा गांधी विद्यालय आरमोरी येथे शिक्षक म्हणून पाच वर्ष अध्यापनाचे कार्य केले. त्यानंतर स्वयं संस्थापीत शिवाजी शिक्षण संस्था गडचिरोली चे सचिव पदावर कार्यरत होते. १९७२ ला मात्र स्वतःची दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संशोधन संस्था स्थापन करून संस्थापक अध्यक्ष म्हणून कार्य करू लागले. महात्मा गांधी विद्यालय आरमोरी येथे असताना गो.ना . साहेबांनी 'खेड्यातली माणसं' हे नाटक लिहिले. या नाटकाचा पहिला प्रयोग दत्त प्रा.स. नाटक समाज आरमोरी यांच्या रंगमंचावर २६ फेब्रुवारी १९६० ला सादर करण्यात आला. मात्र या नाटकाचे प्रकाशन १९९५ ला झाले. या नाटकाचे गडचिरोली ,चंद्रपूर, भंडारा जिल्ह्यात सुमारे शंभराच्यावर प्रयोग यशस्वीपणे विविध संस्थांनी केलेली आहेत.



रंगभूमीचा एक झपाटलेला नाट्य दिग्दर्शक म्हणून त्यांची ओळख झाडीपट्टी नाट्य रंगभूमी परिसरात आहे. त्यांचे अनेक विद्यार्थी रंगभूमीचे रंगकर्मी म्हणून प्रसिद्धीच्या झोतात आहेत .

स्वातंत्र्यपूर्व काळापासून खेड्यापाड्यातील भोळाभाबडा निरक्षर माणूस अक्षरक्ष लुटला जात आहे. रुढी आणि अंधश्रद्धेच्या चिखलात ती पिढ्यान् पिढ्यांपासून रुतून बसलेला हा समाज दैवावर हवाला ठेवून आजही दुःख भोगतच आयुष्य कंठीत आहे. अंधश्रद्धांच्या बजबजपुरीतच सावकारी पाशणे गाव शिवारातील कष्टकरी खेळूतांच्या संसाराचे वाटोळे केली आहे. शिक्षण प्रसाराच्या निमित्ताने येऊ घातलेल्या सुधारणांना स्वीकारणे म्हणजे भयंकर पाप अशी अपराधाची भावना त्यांच्या मनात निर्माण होण्यामागे पारंपारिक समाजव्यवस्था ही कारणीभूत आहे. अशा या ग्रामीण कुटुंबाच्या भावी पिढ्या तरी प्रवाहपतित बनून खेड्यातील माणसांचे निर्माल्य होऊ नये याच उद्देशाने हे नाटक गो.ना . साहेबांनी लिहिलेले आहे.

२६ ऑगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन होऊन स्वतंत्र गडचिरोली जिल्हा अस्तित्वात आला . जिल्ह्याच्या रजत महोत्सवी वर्षात प्रकाशित झालेल्या गडचिरोली जिल्हा गौरवगीत या पुस्तकाची संकल्पना प्रा .मदन धनकर सर यांनी मांडली तर दादा चूधरी यांनी त्यांचे संपादन केलेले आहे .

या गौरवगीतात जिल्ह्यातील निसर्ग, विलक्षण लोकजीवन, समृद्ध पशुपक्षीजीवन, प्राचीन राजवंशाचा इतिहास, उज्ज्वल परंपरा, बहुविध वन्यजीवांचे पोषण करणाऱ्या जीवनदायिनी नद्या विषयी काव्यात्म सत्य जनमानसापर्यंत पोहोचवावी या तळमळीतून गडचिरोली जिल्हा गौरव गीत साकार झाला. उत्तर वाहिनी वैनगंगा जिथे विख्यात मार्कंड्याच कलाशिल्प हे वैभव गीत गात या ओळीतून साहेबांचे शब्द सामर्थ्य, भाषेचे माधुर्य या लेखन शैलीचे दर्शन घडते. यातूनच जिल्ह्याच्या भौगोलिक, ऐतिहासिक आणि कला संस्कृतीचा संपूर्ण लेखाजोगा जिल्हा गौरव गीतातून लालित्यपूर्ण शैलीचे प्रकटला आहे.

नवनिर्मित गडचिरोली जिल्ह्याच्या भूगोलाच्या पाठ्यपुस्तकाचे लेखन करण्याची जबाबदारी महाराष्ट्र शासनाने साहेबांवर सोपविली होती व त्यांनी ती अतिशय चोखपणे पार पाडली.

गडचिरोली येथे काही काळ प्रसिद्ध कादंबरीकार भाऊ मांडवकर हे शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य होते .आदिवासी जीवनाच्या अभ्यासाच्या बाबतीत त्यांचे मोलाचे मार्गदर्शन गो.ना. मुनघाटे साहेबांना मांडवकर यांचे कडून मिळाले . त्याचा प्रभाव 'काटेमुंढरी कादंबरीवर' आढळतो . नवेगावबांध येथे काही काळ प्रसिद्ध पक्षितज्ञ मारुती चितमपल्ली वन अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या सहवासाने साहेबांना पक्षीनिरीक्षणाचा छंद जडला.

कविवर्य ग्रेस विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र असलेल्या 'युगवाणी' चे संपादक म्हणून संपादित केलेली निवडक कवितांमध्ये मुनघाटे साहेबांच्या कवितेचा अंतर्भाव १९६६ मध्ये केला हे उल्लेखनीय आहे .

गो.ना.मुनघाटे साहेबांनी मर्ढेकर यांच्या काव्यानंतर कवी ग्रेस यांच्या काव्याचा अभ्यासक म्हणून काव्यजीवन सुरू केले.

माझी काटेमुंढरीची शाळा ही गो.ना.साहेबांच्या शैक्षणिक अनुभवांच्या मुशीतून साकारलेली कादंबरी आहे. आदिवासींचे दरिद्री जीवन पण प्रगत संस्कृती यांचे सुंदर दर्शन घडवणारी ही कादंबरी गडचिरोली जिल्ह्यातल्या कुठल्याही आदिवासी गावातील शैक्षणिक ग्रामजीवनाचि प्रतिनिधीक कथा सागते. या कादंबरीची पहिली आवृत्ती २००३ मध्ये नागपूरच्या तनुजा प्रकाशनाने प्रकाशित केली आहे. 'माझी काटेमुंढरीची शाळा' या कादंबरीला राज्यशास्त्राचा पुरस्कार तर मिळालाच पण साने गुरुजी यांनी स्थापन केलेल्या पुण्याच्या साधना प्रकाशनाने या कादंबरीच्या चार आवृत्त्या प्रकाशित केल्या. डॉ. अभय बंग यांच्या हस्ते पुण्यात या कादंबरीचे प्रकाशन झाले आणि त्या निमित्ताने प्रसिद्ध समाजवादी नेते मोहन धारिया यांच्या हस्ते साहेबांचा सत्कार झाले. ही कादंबरी कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात व औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मॉडेल कालेज च्या अभ्यासक्रमात नेमण्यात आली. जळगावच्या दीपस्तंभ फाउंडेशन या कादंबरीच्या ३००० प्रति विकत घेऊन महाराष्ट्रातील प्राथमिक शाळा शिक्षकांना दिल्या .अनेक ठिकाणी अनेक कार्यशाळेत या कादंबरीवर चर्चा सुद्धा झालेली आहे.

या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वांङ्मय निर्मितीचा अण्णाभाऊ साठे पुरस्कार २००४ सालि जाहीर झाला. साहेबांनी आपले जे काम करायचे निवडले त्यात त्यांनी प्रामाणिकपणे काम केले. म्हणून १९९४- ९५ सालि संस्थेला महाराष्ट्र शासनाचा आदिवासी सेवा संस्था पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

## गर्भलिंग निदानाची माहिती द्या, एक लाख मिळवा

### जिल्हा शल्य चिकित्सकांचे आवाहन

**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**

### माहिती देणाऱ्याचे नाव राहणार गुप्त

जिल्ह्यामध्ये जर कुठेही गर्भलिंग परीक्षण करून अवैध गर्भपात होत असेल किंवा सोनाग्राफी केंद्रात अपात्र व्यक्तींकडून तपासणी केली जात असेल, तर त्याची खात्री करून प्रशासनाला माहिती द्यावी. ही माहिती देणारी व्यक्ती सामान्य नागरिक, कर्मचारी किंवा अधिकारी यांपैकी कोणीही असू शकते. विशेष म्हणजे, माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव पूर्णपणे गुप्त ठेवले जाईल, याची ग्वाही प्रशासनाने दिली आहे.

**गडचिरोली दि.११ :** जिल्ह्यातील गर्भलिंग निदान प्रतिबंधक (पीसीपीएनडीटी) कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या केंद्रांची किंवा बेकायदेशीर गर्भलिंग निदान करणाऱ्यांची माहिती देणाऱ्या व्यक्तीस शासनामार्फत एक लाख रुपये बक्षीस देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.वर्षा लाहाडे यांनी दिली आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे ६ जानेवारी रोजी पीसीपीएनडीटी जिल्हा सल्लागार समितीची सभा पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा लाहाडे होत्या. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील सध्या कार्यरत असलेल्या ४० नोंदणीकृत सोनाग्राफी केंद्रांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

या बैठकीला निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.बागराज धुर्वे, डॉ. निलकंठ मसराम, डॉ.प्रशांत पेंदाम, डॉ.प्रशांत आखाडे, ॲड. संजय ठाकरे, गणेश नेते, लता पुनघाटे, पुष्पा लाडवे आणि अन्य सदस्य उपस्थित होते. सभेची प्रस्तावना आणि आभार प्रदर्शन पीसीपीएनडीटीच्या विधी सल्लागार ॲड.तृप्ती राऊत यांनी केले.

## आज 'संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा'

**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि.११ :** राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आज दि. १२ जानेवारीला 'संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा २०२५-२६' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत सहभागी विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन स्वरूपात १५ दिवसांचे प्रशिक्षण राबविण्यात येणार असून, या प्रशिक्षणात संविधानासंबंधी सखोल माहिती व मार्गदर्शन दिले जाणार आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी १० जानेवारीपर्यंत इच्छूक विद्यार्थ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# चामोर्शी बस स्थानकाचे काम यावर्षी तरी पूर्ण होईल का?

### राष्ट्रीय मानवाधिकार संघटना

**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**तालुका प्रतिनिधी**



**चामोर्शी दि.११ :** गडचिरोली विधानसभा मतदारसंघातील सर्वाधिक लोकसंख्या व विस्तीर्ण क्षेत्रफळ असलेल्या व गडचिरोली जिल्ह्यातील सर्वात मोठे व्यापारी पेठ म्हणून ओळखले जाणाऱ्या चामोर्शी शहरात दररोज विविध गावातून ये - जा, विद्यार्थी विद्यार्थिनी व अन्य प्रवासी यांना गेल्या साडेसात वर्षापासून प्रचंड त्रासाचा सहन करावा लागत आहे.

चामोर्शी शहरात यशोधरा कन्या विद्यालयाच्या बाजूला गेल्या साडेसात वर्षापासून सुरू असलेल्या अतिशय रेंगाळलेल्या बस स्थानकच्या कामाचे कौतुक करावे तितके कमी आहे कारण गेल्या इतक्या वर्षापासून आजही येथील काम संथ गतीने सुरूच आहे. परंतु काम काही पूर्ण झालेला नाही?

प्रशासनाने आजही याबाबत कुठल्याही प्रश्न कंत्रालदाराला विचारलेला नाही?

दररोज हजारो प्रवासी चामोर्शी येथील मुख्य मार्गालगत उन्हा तान्हात ताटकळत उभे राहतात. विद्यार्थ्यांची दररोज खूप मोठी गैरसोय होते. येथील सर्वसामान्य गोरगरीब विद्यार्थी विद्यार्थिनी व प्रवासी नागरिकांना पैसे देऊन पिण्याचे पाणी बॉटल घेऊन पाणी प्यावे लागते? त्याचप्रमाणे शौचालयाची सोय नसल्याने खूप मोठा त्रासाचा सामना चामोर्शी तालुक्यातील प्रवाशांना व विद्यार्थ्यांना करावा लागत आहे. तरी प्रशासनाने याकडे लक्ष देऊन चामोर्शी शहरात होत असलेल्या नवनिर्मित बस स्थानकाच्या कामाला गती द्यावी व तात्काळ बस स्थानकाचे काम पूर्ण करून लवकरात लवकर येथील बस स्थानक खुले करावे, अशी मागणी राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष रमेश अधिकारी जिल्हा उपाध्यक्ष नानू भाऊ उपाध्ये, किशोर कुंडू, तालुकाध्यक्ष कालिदास बनसोड, तालुका सचिव दिनेश मुजुमदार, संतोष बुरांडे व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी केली आहे.

## शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी व धान विक्री करावी

**गडचिरोली :** आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत दि महाराष्ट्र स्टेट को- ऑप. मार्केटिंग फेडरेशन लिमी. अंतर्गत गडचिरोली जिल्हास्तरावर शासनाची अभिकर्ता संस्था म्हणुन जिल्हा मार्केटिंग अधिकारी, कार्यालय गडचिरोली यांच्या मार्फत वडसा, आरमोरी, गडचिरोली, चामोर्शी व मुलचेरा तालुक्यात धान खरेदी प्रक्रिया राबवित आहे.

दि महाराष्ट्र स्टेट को- ऑप. मार्केटिंग फेडरेशन लिमी., कार्यालय जिल्हा मार्केटिंग अधिकारी गडचिरोली मार्फत शेतकरी बांधवांनी आधारभूत किंमत खरेदी योजना हंगाम २०२५-२६ मध्ये शासन निर्णयातील अटी व शर्ती नुसार धान खरेदी करीता शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी व धान विक्री करण्याचे आवाहन जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांनी केले आहे.



## कार्यालय नगर पंचायत एटापल्ली

क्रमांक/कली/बांध/नपए/२५/२०२६ — दि. ०९/०१/२०२६

### निविदा सूचना प्रसिध्दीकरण

स्थानिक आमदार विकास कार्यक्रम २०२५-२६ अंतर्गत बोरवेल यासारख्या कामांसाठी कंत्राटदाराकडून द्वि लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. सविस्तर निविदा सूचना नगर पंचायत एटापल्ली कार्यालयात बघता येईल. निविदा सादर करण्याची तारीख १२/०१/२०२६ सकाळी १०.३० ते २१/०१/२०२६ सायं. ०५.३० वाजेपर्यंत राहील.

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत एटापल्ली

पेशी तारीख - ०९/०२/२०२६
जाहीरनामा
कोर्ट विद्यमान श्री.स.पू.सदाफळे, साहेब दिवाणी न्यायाधीश, (वरिष्ठ स्तर), गडचिरोली यांच्या न्यायालयात
(वारसान प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा)
निशानी क्रमाक ०६
वारसान मामला क्रमांक ०१/२०२६

अर्जदार - १) श्री.राकेश पुंडलीक बावनवाडे, वय - ३५ वर्षे, धंदा - नौकरी, रा.चामोर्शी, तह. चामोर्शी, जि.गडचिरोली. मो.क्र. ९७३०२५३८३०. २) अश्विनी प्रणय कोतपल्लीवार, वय - ३२ वर्षे, धंदा - घरकाम, रा.चामोर्शी, तह.चामोर्शी, जि.गडचिरोली. ३) पुजा हिमांशु तायडे, वय - ३० वर्षे, धंदा - घरकाम, राह. गांधीनगर, वार्ड क्र.३ आर्णी, तह.आर्णी, जि.यवतमाळ.

-: विरूध्द :-

गैरअर्जदार - निरंक

सर्व आम जनतेस याव्दारे सुचित करण्यात येते की, मय्यत लिलाबाई पुंडलीक बाबनवाडे यांचा आजारपणामुळे उपचारादरम्यान यशोधन हॉस्पीटल, चंद्रपुर येथे दि.१८/०७/२०२४ रोजी मृत्यु झालेला असून वरील अर्जदारांनी वारसान प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

| अ. क्र. | विवरण | बचत खाता क्र. | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | भारतीय स्टेट बँक, शाखा - चामोर्शी | ३१८२९९५७३३ | १५,२८,८५३.२५/- |
| २ | भारतीय स्टेट बँक, शाखा - चामोर्शी | ३२१६०८६२९८४ | २,०३,०४६/- |
| ३ | बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा - चामोर्शी | २०२३५३६७१०१ | ४,९०,३३४/- |
| | एकूण रक्कम | | २२,२२,२३३.२५/- |
| | (अक्षरी रु. बावीस लाख बावीस हजार दोनशे तेहत्तीस रूपये पंचेवीस पैसे फक्त) | | |

वारसान प्रमाणपत्र मिळण्यासाठी वरिल अर्जदारांनी केलेल्या अर्जावर कोणाची उजर व हरकत असल्यास त्यांनी ही जाहीरनामा नोटीस प्रकाशित झाल्यापासुन एक महिण्याचे आत त्यांनी स्वतः किंवा आपले वकिलामार्फत वा योग्य मुखत्यारामार्फत आपली लेखी उजर व हरकत दाखल करावी, अन्यथा तदनंतर हे न्यायालय सद्दहु अर्जदाराचा लागलीच पुरावा घेवुन वारसान प्रमाणपत्र मिळण्यासाठी केलेल्या अर्जावर योग्य तो निर्णय देईल.

सबब जाहीर नोटिस आज दि.०९ माहे जानेवारी, २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

आदेशान्वये,
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर)
गडचिरोली

कोर्ट विद्यमान तालुका दंडाधिकारी, चामोर्शी यांचे न्यायालय
राजस्व प्रकरण क्रमांक/जन्म-मृत्य/148
मौजा :- रामनगट्टा ग्राम पंचायत - कुनघाडा माल.

जाहीरनामा

याव्दारे सर्व जनतेला सुचित करण्यात येत आहे की, श्री.सुंदरशाह डोनूजी सोयाम रा.ईल्लूर पो.ठाकरी ता.चामोर्शी, जि.गडचिरोली यांनी त्यांच्या मुलाचे नामे कुमार. व्येंकटेश सुंदरशाह सोयाम ह्याचा/हिचा जन्म नोंद करणे बाबतचे आदेश मिळणे करिता महाराष्ट्र शासन, सार्वजनिक, आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक नमुना 2525/(ई.आ.991181) प्र.क्र. 22/कु.क.दिनांक 12 मार्च 2025 नुसार जन्म मृत्यु नोंदणी बाबतची कार्यपध्दती निश्चित करणे या अन्वये अर्ज दाखल करून नगर पंचायत / ग्राम पंचायत कुनघाडा माल. येथुन मृत्यु / जन्म नोंदीचा दाखला मिळण्यास अर्ज सादर केलेला आहे. त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रानुसार त्यांची जन्म तारीख 01/12/1993 जन्म स्थळ - रामनगट्टा हे असुन ग्रामपंचायत कुनघाडा माल. अंतर्गत येत असल्याचे नमुद केलेला आहे.

वरील प्रमाणे प्रकरणात चौकशीची कार्यवाही सुरू आहे. सदर बाबतीत कुणाचे काही उजर/तक्रार/आक्षेप असल्यास त्यांनी पुराव्यासहीत तहसिल कार्यालय चामोर्शी येथे आस्थापना शाखा (कक्ष क्रमांक 01 मध्ये दिनांक : 27/01/2026 चे पुर्वी लेखी स्वरूपात सादर करावे.) मुदतीनंतर प्राप्त झालेले कोणतेही आक्षेप/अर्ज स्विकारण्यात येणार नाही. व प्रकरणात निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक :- 8/1/2026
ठिकाण :- चामोर्शी

स्वा/-
तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी चामोर्शी

# बाल वैज्ञानिक भविष्याची गुंतवणूक असून त्यांना चालना देण्याची गरज : पालकमंत्री डॉ. भोयर

## ५३ व्या जिल्हास्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनीचे उद्‌घाटन



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ११**

देशातील अनेक वैज्ञानिकांनी नवनवीन इनोव्हेटीव्ह समोर आणून देशाचे नावलौकिक केले आहे. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना समान संधी मिळाली पाहिजे, यासाठी बाल वैज्ञानिक प्रदर्शनी उपयुक्त ठरत आहे. बाल वैज्ञानिक भविष्याची गुंतवणूक असून त्यांना चालना देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राज्याचे गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनीकर्म राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत जे. बी. सायन्य महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित ५३ व्या जिल्हास्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनीचे उद्घाटन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्याहस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, शिक्षा मंडल संस्थेचे अध्यक्ष संजय भार्गव, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. मंगेश घोगरे, शिक्षणाधिकारी डॉ. महेंद्र गजभिये, प्राचार्य डॉ. प्रदीप टेकाडे, उपशिक्षणाधिकारी ज्ञानेश्वर पानसरे, रुपेश कांबळे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.विज्ञान क्षेत्रातील विद्यार्थ्यांना चांगल्या सोयीसुविधा मिळाल्या पाहिजे, यासाठी शिक्षण विभाग प्रयत्नशील आहे. शिक्षण विभागाचा कार्यभार स्विकारल्यानंतर राज्यस्तरावरील विज्ञान प्रदर्शनीच्या बक्षीस रक्कमेत वाढ करण्याच्या सूचना दिल्या. फक्त बक्षीस देवून चालणार नाही तर त्यांना अधिक ऊर्जा देण्याची गरज आहे. तालुका स्तरावरील विजेत्यांना नागपूर येथील सी.व्ही. रमन सायन्स सेंटर, जिल्हास्तरावरील विजेत्यांना इस्रो येथे तर राज्यस्तरीय विजेत्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायन्स सेंटरला नेण्याची तरतुद येणाऱ्या काळात करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले.

पुढे बोलतांना पालकमंत्री डॉ. भोयर म्हणाले, शिक्षण, विज्ञान, समाजकारण, राजकारण असे अनेक क्षेत्र करियर घडविण्यासाठी उपलब्ध आहे. ज्या कोणत्याही क्षेत्रात आपण काम करु तेथे उत्तमपणे काम करावे. मी ज्या शाळेत शिक्षण घेतले तेथेच मला येऊन विज्ञान प्रदर्शनीचे उद्घाटन करण्याची संधी मिळाली, ही माझ्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे ते म्हणाले.

मुख्य कार्यकारी अधिकारीसोमण म्हणाले, वैज्ञानिक विचारांना प्रेरणा मिळावी, यादृष्टीने वैज्ञानिक प्रदर्शनी उपयुक्त आहे. चिकित्सक बुध्दी व नजर पारखी ठेवून नवनवीन कल्पना करुन विचार करण्याची क्षमता वाढवा, असे ते म्हणाले. संजय भार्गव म्हणाले, मागील पाच वर्षापासून जिल्ह्यातील इतर शाळांसोबत मिळून विज्ञान कार्यक्रम राबवित आहे. देशाला पुढे जाण्यासाठी विज्ञानावर संशोधनाची गरज असून शिक्षण व विज्ञान यांना एकत्रित जोड देण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. सुरुवातीला पालकमंत्री डॉ. भोयर व इतर मान्यवरांनी बाल वैज्ञानिक प्रदर्शनीचे फित कापून उद्घाटन केले व प्रदर्शनीची पाहणी केली. कार्यक्रमाचे संचालन मिनल गिरडकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्राचार्य डॉ. प्रदीप टेकाडे यांनी मानले. यावेळी जिल्हाभरातून आलेले बालवैज्ञानिक, विद्यार्थी, शिक्षक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यात सिकलसेल ॲनेमिया विशेष अभियान

## १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारीपर्यंत व्यापक तपासणी व जनजागृती मोहिम

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ११**

जानेवारी ते ७ फेब्रुवारी या कालावधीत सिकलसेल ॲनेमिया विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. अभियानादरम्यान सिकलसेल आजाराचा प्रतिबंध व नियंत्रण साधण्यासाठी विशेष जनजागृती, तपासणी व समुपदेशन मोहिम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेस यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी आरोग्य विभागास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले आहे.

अभियानादरम्यान ० ते ४० वर्षापर्यंतच्या वयोगटातील सर्व नागरिकांची सिकलसेल तपासणी, रुग्ण व वाहकांची नोंदणी, आवश्यकतेनुसार एचपीएलसी, इलेक्ट्रोफोरेसिस चाचण्या तसेच रुग्णांना उपचार व समुपदेशन देण्यात येणार आहे. भावी पिढीतील आजाराचे प्रमाण कमी करण्यासाठी विवाहपूर्व व प्रसूतीपूर्व समुपदेशन सत्रांचे आयोजनही करण्यात येणार आहे. ही मोहिम अधिक परिणामकारक करण्यासाठी जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्र व आयुष्मान आरोग्य मंदिरांमध्ये आवश्यक मनुष्यबळ व तपासणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. जनजागृतीसाठी बॅनर, पोस्टर, पत्रके, सोशल मीडिया, गृहभेटी, शाळा-महावि?द्यालयांतील सत्रे, प्रश्नमंजुषा, रांगोळी व निबंध स्पर्धा, महिला मंडळे आदी माध्यमांचा वापर केला जाणार आहे. ही मोहिम मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या मार्गदर्शनाखाली राबविली जाणार आहे.नागरिकांनी या विशेष मोहिमेचा लाभ घेऊन सिकलसेल तपासणी करून घ्यावी. आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आणि सिकलसेलमुक्त वर्धा जिल्हा घडविण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले यांनी केले आहे.

# अशोक राऊत यांची गटनेतेपदी निवड

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**देवळी, दि. ११**



नगरपालिकेच्या सभागृहात काँग्रेसच्यावतीने काँग्रेसच्या गटनेतेपदी नगरसेवक अशोक राऊत यांची निवड करण्यात आली .काँग्रेसच्या नगरसेवकांनी सर्वानुमते सुचविल्याप्रमाणे जिल्हाधिकारी वामनथी सी. यांनी ही निवड केली.

देवळी नगरपालिका सभागृहात एकूण २० सदस्यांची संख्या असून त्यातील १६ नगरसेवक भाजपाकडे व चार नगरसेवक भारतीय राष्ट्रीय काँग्रेसकडे आहे यामध्ये अशोक राऊत, स्वप्निल कामडी, मिलिंद देशमुख व अर्चना मून यांचा समावेश आहे. गटनेतेपदी निवड झाल्याबद्दल माजी आमदार रणजीत कांबळे, यांच्यासह माजी नगराध्यक्ष सुरेश वैद्य, शहर कमिटीचे अध्यक्ष अजय देशमुख, माजी नगरसेवक सुनील बासू, पवन महाजन, माजी नगराध्यक्ष अब्दुल जब्बार तंवर, रहमान तंवर , कृष्णकांत शेंडे आदींनी आनंद व्यक्त केला.

# १०१ घरकाम करणाऱ्या महिलांना साडीचोळी भेट

## सावित्रीच्या लेकी सन्मानित



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**कारंजा(घा), दि. ११**

शहरात स्वयंपाक, धुणी, भांडी व झाडू पोचा घरकाम करणाऱ्या १०१ सावित्रीच्या लेकींचा शहरात प्रथमच सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी त्यांचा पुष्पगुच्छ, पुस्तक, सन्मान चिन्ह तसेच साडी चोळी व स्मृतिचिन्ह भेट देऊन सन्मान करण्यात आला.

आमदार सुमित वानखेडे यांचे अध्यक्षतेखाली मराठी चित्रपट यशवंतचे दिग्दर्शक, जुना फर्निचर चित्रपटाचे सहकलाकार पीयूष विजय भोंडे यांचे हस्ते लेडी गव्हर्नर प्राचार्य डॉ.कमल गवई ,सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या मातोश्री तसेच मिशन आय ए एस चे संचालक डॉ.प्रा.नरेशचंद्र काठोळे, विद्या काठोळे, जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सरिता गाखरे, ठाणेदार अनिल मेश्राम यांचे प्रमुख उपस्थितीत दीप प्रज्वलन व सावित्री आणि जोतिबा यांच्या प्रतिमा पूजनाने उद्घाटन सोहळा पार पडला.कारंजा कला क्रीडा अकादमी, गुरुकुल पब्लिक स्कूल आणि माळी महासंघ कारंजा तसेच कारंजा घाडगे शहरातील दान

दात्यांच्या सहकार्याने स्व. मन्नालाल मातादिन अग्रवाल सभागृहात आयोजित या सोहळ्यात गुलाब पुष्प, ग्रामगीता, व शाल देऊन पाहुण्याचे स्वागत व सत्कार आयोजकातर्फे करण्यात आला. मी सावित्रीबोलतेयही नाट्यछटा सादर करणारी गुरुकुल पब्लिक स्कूलची धनश्री किशोर जत्ती व सावित्री जोतिबा यांची सुंदर रांगोळी साकारणारे वैष्णवी राजेश घिमे व आदित्य या युवा कलाकारांना तसेच स्वागत गीत व सावित्रीबाईवर गीत सादर करणाऱ्या तसेच दानदात्यांना पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

शहरात प्रथमच अशा आगळ्यावेगळ्या सोहळ्याचे आयोजन होत असल्याचे आमदार सुमित वानखेडे म्हणाले.सावित्रीबाई ही महिलांसाठी एक प्रेरणादाई आदर्श असल्याचे डॉ कमल गवई यांनी सांगितले.महिलांनी आपल्या मुलांना कलेक्टर बनण्यासाठी पुढाकार घ्यावा असे मत मिशन आयएएसचे नरेशचंद्र काठोळे यांनी व्यक्त केले.फुले दाम्पत्यांनी विविध सामाजिक क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान दिले असे विचार उद्घाटक मराठी चित्रपट यशवंत चे दिग्दर्शक पीयूष भोंडे यांनी मांडले. सन्मान सोहळ्यात शिक्षण क्षेत्रात सेवा दिलेल्या स्व.भारती प्रकाश धारपुरे व स्व. नीलिमा राजेश जोरे, स्व. प्रा.वंदना अशोक पराडकर स्मृतिप्रीत्यर्थ सन्मान चिन्ह देण्यात आले.सरिता गाखरे, कल्पना मस्की, नीता मिश्रा, सुजाता कांबळे, संगीता कुरमेती, संगीता कामडी, प्रा.सतीश काळे, राजेश जोरे, ॲड. प्रकाश धारपुॲड.अशोक पराडकर, शुभम वानखडे, रवी राऊतकर, राहुल पैठणे, संजय सातपुरे, प्रल्हाद(पैलू) मोटवानी, डॉ.दादाराव रामटेके, प्रा.डॉ.गणेश मोहोड, राजू डोंगरे, रमेशराव नांदणे, प्रा.नेत्राम ढोबाळे, राम प्रांजळे, ज्ञानेश्वर गावंडे या दान दात्यांच्या आर्थिक सहकार्यातून भेटवस्तू देण्यात आल्या.

प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय आयोजक विलास वानखडे यांनी संचालन जया ठोंबरे यांनी केले तर आभार शरद बोके यांनी मानले.

# रेतीची अवैध वाहतुक, ५ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**हिंगणघाट, दि. ११**

काळ्या रेतीची अवैधरित्या चोरटी वाहतुक होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारावर पोलिसांनी वॉश आऊट मोहिम राबवुन सास्ताबाद ते वाघोलीरोडवर नाकेबंदी करीत कारवाई दरम्यान रेतीसह ५ लाख ५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला.

येथील गुन्हे प्रकटीकरण आदेशाने वॉश आउट मोहीम राबवित असतांना मांडगावकडुन वाघोलीकडे ट्रॅक्टरने अवैधरित्या विना परवानगीने काळया रेतीची चोरटी वाहतुक करणार असल्याच्या माहितीवरुन सास्ताबाद ते वाघोली रोडवर वाहने सुरक्षीत रोडचे बाजुला उभे करून नांकाबदी करीत असताना विना क्रमांकाचा ट्रॅक्टर येताना दिसल्याने ट्रॅक्टर चालकांस थाबवून चालकास त्याचे नाव, पत्ता विचारला असता गणेश सुनील डांगरी वय (३१) रा.मांडगांव ता.समुद्रपुर असे सांगितले. ट्रॅक्टर व ट्रॉलीचीपंचासमक्ष पाहनीकेलीअसता विना परवाना ट्रॅक्टर किं.४ लाख रु, ट्राली किंमत १लाख रु व ट्रॉलीमध्ये भरून असलेली एक ब्रॉस



रेती(१०० फुट) गौण खनिज ओली रेती किं. ५,०००रू असा एकू.५लाख ५ हजार रू चा मुद्देमाल मिळून आला. जप्ती पंचनामा करीत आरोपीस ताब्यात घेत कायदेशीर कार्यवाही करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशिलकुमार नायक, पोलीस निरीक्षक अनिल राऊत यांचे आदेशाने पोलीस स्टेशन हिंगणघाट येथील डि.बी. पथकाचे प्रशांत ठोंबरे, राजेश शेंडे, आशिष नेवारे, रोहीत साठे, मंगेश वाघमारे यांनी केली.

# १५ जानेवारी रोजी राज्य क्रीडा दिनाचे आयोजन

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ११**

भारतीय ऑलिंपिक पदक विजेते स्व. खाशाबा दादासाहेब जाधव यांच्या जयंती निमित्तक्रीडा व युवकसेवा संचालनालयांतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्यावतीने १५ जानेवारीरोजीराज्य क्रीडा दिन साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात शैक्षणिक संस्था, क्रीडासंघटना व नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित शाळा, महाविद्यालये तसेच क्रीडा संघटनांनी आपल्या स्तरावर उपक्रम राबवून याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयास सादर करावी, असे जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी कळविले आहे.

## निधन वार्ता

### सुनीता सोनटक्के

**विरुळ (आ), :** माजी सरपंच लक्ष्मण सोनटक्के यांच्या पत्नी सुनीता(६६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचया पश्चात २ मुली, जावई, नातवंडे असा आप्तपरिवार आहे.त्यांची अंत्ययात्रा स्थानिक निवासस्थानातून निघेल.पप्पू ढोबळे यांच्या त्या सासुबाई होत.

# कराटे स्पर्धेत इंडियन मिलिटरी स्कूलचे यश



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**पुलगाव, दि. ११**

६ वी टी. एस. आर. के.के.ओ.आई.राष्ट्रीय ओपन कराटे स्पर्धा चरखा गृह सेवाग्राम येथे झाली. या स्पर्धेमध्ये ४७८ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेमध्ये इंडियन मिलिटरी स्कूल च्या २० विद्यार्थ्यांनी काता आणि कुमिते या प्रकारात सहभागी होऊन ८ गोल्ड मेडल व ११ सिल्वर मेडल १४ ब्राँझ मेडल पटकावले असे ३३ मेडल पटकावले.

तसेच या संपूर्ण स्पर्धेमध्ये सर्वात जस्त मेडल प्राप्त करणारी दुसरी शाळा असा मान प्राप्त केला..द्वितीय क्रमांकाची ट्रॉफी जिंकली.

## पदक विजेते विद्यार्थी

आतिक शेख सिल्वर,ओम बावणे ब्रॉंझ, उत्कर्ष फुलझेले गोल्ड, करण चंबूलवार सिल्वर, दक्ष नैताम सिल्वर, आयुष राजुरकर ब्रॉंझ, वेदांत कोरे ब्रॉंझ,तन्मय निमगडे गोल्ड, युवराज भिंगारे ब्रॉंझ, अर्णव धुर्वे ब्रॉंझ, लक्ष पेढेकर ब्रॉंझ, अंश भोवते ब्रॉंझ, अर्पित मंडाळी ब्रॉंझ ,तेजस तोडासे सिल्वर, जयेश मसराम सिल्वर, जिग्नेश कांबळेसिल्वर, कृतज्ञ उपरकर गोल्ड, नमन पंधरे गोल्ड ,नमन वड्डे गोल्ड ,सक्षम दिघाडे सिल्वर, शाळेचं कमांडंट कर्नल के एच पाटील,मुख्याध्यापक रविकिरण भोजने, पर्यवेक्षक नितीन कोठे यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# जागतिक पारायण दिन उत्साहात साजरा



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**पुलगाव, दि. ११**

येथील श्री संत गजानन महाराज देवस्थानच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही दि. ११ जानेवारी रविवारला जागतिक पारायण दिन निमित्त सामुहिक पारायण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.श्री गजानन महाराज मंदिराच्या सभागृहामध्ये श्री गजानन विजयग्रंथाचे पारायण वाचक संध्या गजकेश्वर, यांच्या प्रमुख उपस्थित सकाळी ८ वाजता पारायणाला प्रारंभ झाला. श्री गजानन महाराज मूर्तीचे पूजन व आरती झाल्यानंतर ग्रंथ पूजन करण्यात आले. कथा वाचिका संध्या गजकेश्वर यांचे स्वागत रूपाली देशमुख यांनी केले.प्रास्ताविक प्रमोद घालणी यांनी केले.

वृद्ध, दिव्यांग , गुडघ्यांचा त्रास असलेल्या वाचकांसाठी बसण्यास विशेष व्यवस्था करण्यात आली.पारायणाला मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या.पारायणकर्त्यांसाठी चहा, नास्ता व महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली.पारायण समाप्ती नंतर आरती करण्यात आली. मुख्य वाचक यांचा संध्या गजकेश्वर यांचा सत्कार देवस्थानच्या सचिव सुनिता मिश्रा यांनी केला. कार्यक्रमाचे संचालन अविनाश भोपे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेंसाठी देवस्थान अध्यक्ष मनोज देशमुख, प्रमोद घालणी, मनोज चव्हाण, शंकर खंडागळे, शेखर बाभुळकर, संतोष बैतुले, तृप्ती विरखेडे, प्रकाश मेटे, अनिल चव्हाण, रुपाली देशमुख, अल्का घालनी, सुनिता मिश्रा, कमल जगताप, गजानन सरदार, अनिल लेकुरवाळे आदींनी सहकार्य केले.

# युवकास चाकूने मारण्याची धमकी

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ११**

मित्रासोबत नाश्ता करण्यास गेलेल्या युवकाला शिवीगाळ करत चाकूने मारण्याची धमकी दिली, ही घटना महिला आश्रम परिसरात घडली, सुजल भलमे हा मित्रांसोबत नाश्ता करण्यासाठी गेला असता नयन सुरेंद्र भलमे हा दुचाकीने आडवा झाला आणि विनाकारण वाद करत शिवीगाळ केली, शिवीगाळ करण्यास हटकले असता नयनने चाकू काढून फिरवला मात्र, मित्राने तो वार हुकला, काही वेळाने पुन्हा नयन याने सुजलला शिवीगाळ करत त्याच्या भावाला मारले, याप्रकरणी शहर पोलिसात तक्रार दाखल केली आहे.

# श्री कृष्णगीरी महाराज पुण्यतिथी महोत्सव

## धोत्रा(रे) येथे १४ जानेवारीपासुन विविध धार्मिक कार्यक्रम

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ११**

सद्गुरु परमहंस श्री कृष्णगीरी महाराज विश्वशांती धाम संस्थान, धोत्रा (रेल्वे) येथे बुधवार, दि. १४ ते २१ जानेवारी पर्यंत वार्षिक पुण्यतिथी महोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे.

हा महोत्सव संस्थापक स्व. शंकरबाबा गुल्हाने व गुरुनिष्ठ वात्सल्य स्वरूप तिर्थ आई स्व. विमलआई गुल्हाने यांच्या पावन स्मृतीप्रित्यर्थ साजरा होणार आहे.

महोत्सवाच्या कालावधीत दररोज सकाळी ६ ते ६.३० वाजता श्री कृष्णगीरी महाराजांचे अभिषेक व कलश स्थापना, तसेच काकड आरती होणार आहे. सकाळी ६.३० ते ७.०० या वेळेत ह.भ.प. हरिहर देशपांडे महाराज (धोत्रा रेल्वे) यांच्या पावनमुखातून परमहंस श्री कृष्णगीरी महाराजांचे लिलामृत चरित्रवाचन होणार आहे. दररोज दुपारी २ ते सायं. ६ या वेळेत पूज्य श्री श्यामनारायणदासजी महाराज (अयोध्या) यांच्या पावनमुखातून शिव महापुराण कथा ऐकवली जाणार आहे. कथेदरम्यान शिवलिंग, भस्म, रुद्राक्ष महिमा, शिव-पार्वती विवाह, बारा ज्योतिर्लिंग महिमा, शिव पंचाक्षर मंत्र आदी पावन प्रसंगांचे वर्णन होणार आहे. महोत्सवात विविध गायक, वादक, पुरोहित व भक्तिमंडळींचा सहभाग राहणार असून भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. बुधवार, दि. २१ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजता रथयात्रा व दिंडी सोहळा ढोल-ताशांच्या गजरात निघणार आहे. त्यानंतर गोपालकाला, महाआरती, संत दर्शन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सात दिवसीय पुण्यतिथी महोत्सवात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

